



# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक ६५ * नांदेड * मंगळवार, दि. १० मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## राज्यात नवीन ऑटो रिक्षा परवान्यांना ब्रेक, आजपासून परवाने स्थगित

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील वाढती वाहतूक कोंडी आणि शहरी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. दि. ९ मार्चपासून राज्यभर नवीन ऑटो रिक्षांना परवाने देण्यास स्थगिती देण्यात आली असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली. मंत्रिमंडळासोबत चर्चा करून स्पष्ट धोरण (एसओपी) तयार केल्यानंतरच पुढे नवीन परवाने देण्याबाबत निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

याबाबत बोलताना मंत्री सरनाईक यांनी म्हणाले की, राज्यातील मोठ्या शहरांमध्ये ऑटो रिक्षांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर होत आहे. विशेषतः मुंबई आणि उपनगरांमध्ये रिक्षांचा सुळसुळाट झाल्याने वाहतुकीवर मोठा ताण येत आहे. या पार्श्वभूमीवर काही काळासाठी नवीन परवाने देण्याची प्रक्रिया थांबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



या संदर्भात केंद्र सरकारशी पत्रव्यवहार केल्यानंतर रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने राज्य सरकारला स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचा सल्ला दिला आहे. मोटार वाहन (दुरुस्ती) अधिनियम २०१९ अंतर्गत राज्य सरकारला वाहतूक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी आवश्यक अधिकार आणि लवचिकता देण्यात आली असल्याचे केंद्राने स्पष्ट केले आहे. तसेच मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम ६७ (३) नुसार राज्य सरकारला प्रवासी व मालवाहतुकीसंदर्भातील परवाने बदलण्याचा तसेच विविध योजना राबविण्याचा अधिकार आहे. या अधिकारांचा वापर करून वाहतूक कोंडी कमी करणे, लास्ट माईल कनेक्टिव्हिटी सुधारणे आणि शहरांमधील वाहतूक व्यवस्थेचे नियमन करणे शक्य असल्याचेही केंद्राने स्पष्ट केले आहे.

राज्यातील ५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचा अधिकार राज्य सरकारकडे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे स्थानिक परिस्थिती, वाहतुकीच्या गरजा आणि नागरिकांच्या सोयी लक्षात घेऊन लवकरच नवीन धोरण तयार करण्यात येईल. दरम्यान, या निर्णयामुळे राज्यात नवीन ऑटो रिक्षा परवाने सध्या मिळणार नसून मंत्रिमंडळाच्या चर्चेनंतर आणि स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे (एसओपी) निश्चित झाल्यानंतरच पुढील परवाने देण्याचा निर्णय घेतला जाणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

## सोशल मीडियावर महिलांविषयी आक्षेपार्ह टिप्पणी करणे भोवणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** सोशल मीडियाच्या माध्यमातून सामान्य महिलांपासून ते महिला अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांनाच खालच्या पातळीवर जाऊन लक्ष्य केले जात आहे. अशा प्रवृत्तींमुळे महिलांच्या मन:स्वास्थ्यावर गंभीर परिणाम होत असून, हे प्रकार रोखण्यासाठी राज्य सरकार आता कठोर पावले उचलणार आहे. सायबर गुन्हेगारी आणि महिलांविरोधी टिप्पणी रोखण्यासाठी गृहविभागासोबत विशेष समन्वय साधला जाईल, अशी घोषणा महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सोमवारी विधानसभेत केली.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मांडलेल्या प्रस्तावावर झालेल्या चर्चेला तटकरे उत्तर देत होत्या. यावेळी त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि सुरक्षेसाठी विविध महत्त्वपूर्ण योजनांची घोषणा केली. महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ मिळावी यासाठी राज्यात 'उमेद मॉल' ही संकल्पना राबवण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात प्रायोगिक तत्त्वावर १३ जिल्ह्यांमध्ये हे मॉल उभारले जातील. तालुक्याच्या प्रमुख बाजारपेठांमध्ये बचत गटांच्या वस्तू आणि खाद्यपदार्थ उपलब्ध करून दिले जातील, असे तटकरे यांनी सांगितले.

## मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणारी 'मिसिंग रेल्वे लिंक' पूर्ण करा

### नांदेड-लातूर रेल्वे प्रकल्पाबाबत खा. अशोकराव चव्हाण यांची केंद्राकडे आग्रही मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड-लातूर थेट रेल्वे मार्गाचा प्रस्ताव केवळ दोन जिल्ह्यांना जोडणारा प्रकल्प नसून हा विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या तिन्ही विभागांना रेल्वे मार्गे जवळच्या अंतराने जोडणारी एक महत्त्वाची 'मिसिंग लिंक' असल्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे. या प्रकल्पाला केंद्र सरकारने मंजुरी देण्याची मागणी आज राज्यसभेत मांडताना ते बोलत होते.

शून्य प्रहरात काळात हा मुद्दा उपस्थित करताना ते म्हणाले की, नांदेड आणि लातूर ही मराठवाड्यातील कृषी व व्यापाराची मोठी केंद्रे आहेत. मात्र, या दोन शहरांत अद्याप थेट रेल्वे मार्ग नाही. सध्या रेल्वेने



२१२ किमीचा वळसा घालून जाण्यासाठी ६ तास लागतात, तर रस्ते मार्ग १४४ किमीचा आहे. प्रस्तावित १०४ किमीच्या नवीन थेट रेल्वे मार्गामुळे हा प्रवास अवघ्या सव्वा तासात पूर्ण होणे शक्य आहे.

या प्रकल्पाचे व्यापक महत्त्व स्पष्ट करताना खा. अशोकराव चव्हाण यांनी तांत्रिक आकडेवारी सादर केली. ते म्हणाले की, ही मिसिंग लिंक पूर्ण झाल्यास विदर्भातील नागपूर आणि पश्चिम महाराष्ट्रात मिरज या दोन मोठ्या रेल्वे जंक्शनमधील अंतर ९९१ किमीवरून ८०७ किमीवर येईल. म्हणजेच सुमारे १८४ किमीचे अंतर कमी होईल. याचा थेट फायदा विदर्भ आणि शेजारील छत्तीसगड, मध्यप्रदेशातील बिलासपूर व जबलपूर सारख्या शहरांना पश्चिम किनारपट्टीकडे जाण्यासाठी होईल.

महाराष्ट्र सरकारने या प्रकल्पाच्या खर्चात आपला ५० टक्के वाटा उचलण्याचे आधीच मान्य केले आहे. या प्रकल्पाचा 'फायनल लोकेशन सर्व्हे' देखील पूर्ण झाला असून प्रस्ताव रेल्वे मंत्रालयाकडे प्रलंबित आहे. केंद्र सरकारने याला तातडीने मंजुरी दिल्यास राज्याच्या आर्थिक विकासाला मोठी गती मिळेल, असे ते पुढे म्हणाले.

## महापालिकेची १६ मार्च रोजी पहिली सर्वसाधारण सभा

### स्थायी समिती, परिवहन, महिला समितीवर होणार नगरसेवकांची नियुक्ती



**नांदेड (प्रतिनिधी)–** पहिल्यांदा भाजपच्या ताब्यात असलेल्या महापालिका निवडणुकीनंतर पहिलीच सर्वसाधारण सभा सोमवार, दि. १६ मार्च रोजी होणार आहे. या सभेत चार विषय ठेवण्यात येणार आहेत. त्यात गत विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे, स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती, पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आणि महिला व बालकल्याण समितीवर ११ सदस्यांची नियुक्ती तसेच भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांचा शहरात पुतळा बसविणे यांचा समावेश आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या कै. शंकरराव चव्हाण सभागृहात १६ मार्च रोजी सकाळी ११ वाजता ही पहिली सर्वसाधारण सभा घेण्याचा मुहूर्त ठरला आहे. या सभेत ४ विषय ठेवण्यात येणार आहेत. पहिला विषय हा १० फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्याबाबतचा आहे. स्थायी समिती, परिवहन समिती, पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती होणार असून संख्याबळानुसार भारतीय जनता पार्टी-शिवसेना महायुतीला १० सदस्य, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडी यांना ३, एमआयएमला ३ असे एकूण १६ सदस्यांची नियुक्ती होणार आहे. तसेच पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण व महिला व बालकल्याण समितीवर ११ सदस्यांची निवड होणार असून त्यामध्ये भारतीय जनता पार्टी- शिवसेना महायुती ७ सदस्य, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व वंचित बहुजन आघाडी यांना २, तर एमआयएम पक्षाला २ सदस्यांची नियुक्ती होणार आहे. तर भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न कै. अटलबिहारी वाजपेयी यांच्या कायार्चा गौरव म्हणून त्यांना भारतरत्न देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांच्या कार्याची ओळख नवीन पिढीला व्हावी याकरिता नांदेड शहरातील उचित ठिकाणी त्यांचा पुतळा बसविण्यासाठी प्रस्ताव ठेवण्यात येणार आहे. योगायोगाने महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपची सत्ता आली आहे. तर विरोधी पक्षाच्या सदस्यांची संख्याही चांगली आहे. यामुळे ही पहिला सभा विविध समितीवरील सदस्य निवडीसाठी असली तरी ही सभा कशी पार पडते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान स्वीकृत सदस्य निवडीचा विषयही कसा हाताळला जातो, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

## युद्धाचा फटका! गॅसच्या तुटवड्यामुळे मुंबईतील अनेक हॉटेल्स बंद

**मुंबई (प्रतिनिधी)–** आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या इराण-इस्रायल-अमेरिका संघर्षाचा परिणाम आता भारतातील हॉटेल उद्योगावरही दिसू लागला आहे. इराण-इस्रायल-अमेरिका संघर्षामुळे गॅसचा तुटवडा निर्माण झाला असून मुंबईतील जवळपास अनेक हॉटेल्स बंद ठेवण्यात आली आहेत, अशी माहिती आहार या संघटनेने दिली आहे.

गॅसचा तुटवडा आणखी काही दिवस कायम राहिल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते. पुढील तीन दिवसही गॅस पुरवठा सुरळीत झाला नाही, तर मुंबईतील सुमारे ५० टक्के हॉटेल्स बंद करण्याची वेळ येऊ शकते, असा इशारा आहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षामुळे गॅस पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे देशभरात आणि राज्यातही गॅसचा तुटवडा जाणवू लागला आहे. मुंबईत हॉटेल व्यवसाय मोठ्या प्रमाणावर एलपीजी आणि कमर्शियल गॅसवर अवलंबून असल्याने या तुटवड्याचा थेट परिणाम हॉटेल उद्योगावर होत आहे.

## मास कॉपी : राज्यात ८१ शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे निलंबन

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षांदरम्यान मास कॉपीच्या प्रकारांवर मोठी कारवाई करण्यात आली असून आतापर्यंत ८१ शिक्षक व कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. अशी माहिती राज्य मंडळाने परिपत्रकाद्वारे दिली आहे.

यंदा परीक्षा केंद्रांवर लावलेल्या सीसीटीव्ही यंत्रणेमुळे मास कॉपीचे प्रकार पुराव्यासह समोर आले. त्यानंतर संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे.

बीड जिल्ह्यातील चौसाळा येथील कला-विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या केंद्र क्रमांक २२४ वर बारावीच्या परीक्षेदरम्यान कॉपी झाल्याचे उघड झाले. या प्रकरणात प्रशासनाने १७ कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना निलंबित केले. हा प्रकार १० फेब्रुवारी रोजी पहिल्याच पेपरच्या दिवशी घडल्याची माहिती आहे.

तसेच कन्नड तालुक्यातील जैतापूर येथील राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालयाच्या केंद्र क्रमांक ००७९ वरही सामूहिक कॉपीचा प्रकार उघडकीस आला. सीसीटीव्ही फुटेजमध्ये पर्यवेक्षक आणि केंद्र संचालक प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करत असल्याचे दिसून आल्याने २४ जणांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून त्यापैकी २१ जणांना निलंबित करण्यात आले आहे.

दरम्यान जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील दोन केंद्रांवर इंग्रजी विषयाच्या पेपरदरम्यान विद्यार्थ्यांकडून कॉपी करताना आढळले. या प्रकरणात पर्यवेक्षक म्हणून नियुक्त असलेल्या ५ शिक्षकांवर कारवाई करण्यात आली आहे.

याशिवाय गडचिरोली जिल्ह्यातील एका परीक्षा केंद्रावर राज्यशास्त्र विषयाच्या पेपरमध्ये मायक्रोनोट्स आणि प्रिंटआउटच्या मदतीने सामूहिक कॉपी केल्याचे आढळले. या प्रकरणात तीन शिक्षक आणि एका शिपायावर गुन्हा दाखल करून सर्वांना निलंबित करण्यात आले आहे. या कारवाईमुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

## महाराष्ट्रात दोन अर्ज बाद ठरल्याने राज्यसभा निवडणूक बिनविरोध

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागांसाठी होणारी निवडणूक अपेक्षेप्रमाणे बिनविरोध झाली आहे. गुरुवारी दाखल झालेल्या नऊ अर्जांपैकी दोन अपक्ष उमेदवारांचे अर्ज तांत्रिक कारणास्तव बाद ठरल्याने सात जागांसाठी सातच उमेदवार रिंगणात उरले. यामध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले आणि भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्यासह सातही नेत्यांच्या बिनविरोध निवडीवर शिक्कामोर्तब झाला आहे.

## इराण युद्धावरून दोन्ही सभागृहात विरोधकांकडून चर्चेची मागणी

### केंद्र सरकार म्हणाले, लोकसभा सभापतींना हटवण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्यास तयार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्याच्या सोमवारी पहिल्या दिवशी लोकसभा आणि राज्यसभेत अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धावरून मोठा गोंधळ झाला. विरोधकांनी पश्चिम आशियातील युद्धोत्तर परिस्थितीवर चर्चा करण्याची मागणी केली. दरम्यान, परराष्ट्रमंत्र्यांनी प्रथम राज्यसभेत आणि नंतर लोकसभेत आखाती देशांमधून भारतीयांच्या परतीच्या तयारी आणि ऊर्जा संकटाबद्दल भाषण केले.


राज्यसभेत विरोधकांनी सभात्याग केला. जयशंकर म्हणाले, सध्या इराणी नेतृत्वाशी संपर्क साधणे कठीण आहे, परंतु भारत शांतता आणि संवादाच्या बाजूने आहे. लोकसभेत विरोधकांनी परराष्ट्रमंत्र्यांना बोलण्यापासून रोखले. त्यांच्या भाषणादरम्यान त्यांनी गोंधळ घातला, खासदारांनी आम्हाला चर्चा हवी आहे असे घोषणा दिल्या.

दरम्यान, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर निवेदन देताना म्हणाले, सध्याचा संघर्ष भारतासाठीही चिंतेचा विषय आहे. आपण शेजारी आहोत आणि पश्चिम आशियात स्थिरता राखणे ही आपली जबाबदारी आहे. दहा लाख भारतीय आखाती देशांमध्ये राहतात आणि काम करतात. काही हजार भारतीय शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी इराणमध्ये आहेत. हा प्रदेश आपल्या ऊर्जा सुरक्षेसाठी महत्त्वाचा आहे आणि त्यात तेल आणि वायूचे अनेक आवश्यक पुरवठादार आहेत. पुरवठा साखळीतील व्यत्यय आणि अस्थिरता ही गंभीर समस्या आहेत.

## सुप्रसिद्ध गायिका रिहानाच्या घरावर गोळीबार, संशयित महिलेला अटक

**लॉस एंजेलिस (वृत्तसंस्था)–** मनोरंजन जगतातील सुप्रसिद्ध गायिका रिहाना हिच्या घरावर गोळीबार झाल्याची घटना समोर आली आहे. एका महिलेने रिहानाच्या घराच्या दिशेने वारंवार गोळीबार केला. या घटनेत कुणीही जखमी झाले नसून गोळीबार करणाऱ्या महिलेला पोलिसांनी अटक केली आहे.

लॉस एंजेलिस पोलिस विभागाने याची पुष्टी करत सांगितले की, रविवार, ८ मार्च रोजी रिहानाच्या घराजवळ गोळीबाराची घटना घडली. या वेळी ५ ते ७ गोळ्या झाडण्यात आल्या. गोळ्या घराच्या गेटला लागल्या, मात्र घराच्या आत पोहोचल्या नाहीत. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. त्या वेळी घरात लोक उपस्थित होते. पोलिसांनी सांगितले की या प्रकरणात ३० वर्षांच्या एका महिलेला अटक करण्यात आली आहे.



## कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान अनेक गुन्हेगारांची झाडाझडती; काहींना बजावल्या नोटीस

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार, दि. ८ मार्च रोजी कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. यासाठी २६ पोलीस अधिकारी यांनी शंभरहून अधिक कर्मचारी यांनी एकसाथ हे ऑपरेशन राबवून अनेक गुन्हेगारांची झाडाझडती घेतली. त्यांच्या हालचालीबाबत चौकशी केली आणि काहींना नोटीसा दिल्या आहेत.

नांदेड शहरातील चोरीच्या व हिंसक गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक यांच्या ऑपरेशन फ्लश आऊटअंतर्गत कारवाई सुरू आहे. दि. ८ मार्च रोजी सकाळी ४ वाजल्यापासून ते ८ वाजेपर्यंत ही मोहीम राबविली. शहरामध्ये सराईत गुन्हेगारांना चेक करून कारवाई करण्यासाठी कोम्बिंग ऑपरेशनचे आयोजन केले होते.



सदर कोम्बिंग ऑपरेशन कामी स्थानिक गुन्हे शाखा येथील अधिकारी, अंमलदार तसेच नांदेड शहरातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, दुय्यम अधिकारी व अंमलदार यांनी सहभाग घेतला होता. यात जवळपास २६ अधिकारी आणि १०१ पोलीस कर्मचारी यांचा सहभाग होता. या ऑपरेशन दरम्यान दखलपात्र गुन्हे असलेल्या चार जणांविरुद्ध तर अदखलपात्र दोन जणांवर कारवाई करण्यात आली. भारतीय हत्यार कायदा अंतर्गत २१ जणांची तपासणी करून दोन जणांना समन्स बजावण्यात आले. कलम ५५, ५६, ५७ नुसार २२ आरोपींची तपासणी करण्यात आली तर हद्दपार आणि तडीपारमधील गुन्हेगारांच्या हालचालीची नोंद घेतली आहे. तसेच शारीरिक आणि मालाविरुद्ध गुन्हे करणाऱ्या ७० गुन्हेगारांची चौकशी केली आहे.

एवढेच नाही तर विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाला अटक करून त्याच्याकडून तलवार जप्त करण्यात आली आहे.

## किल्ले रायगडाच्या पायथ्याशी मनसेचा २० वा वर्धापन दिन साजरा

### राज ठाकरेंकडून सहकुटुंब शिवरायांना अभिवादन

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा २० वा वर्धापन दिन किल्ले रायगडाच्या पायथ्याशी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे त्यांची पत्नी शर्मिला ठाकरे आणि पुत्र अमित ठाकरे यांच्यासह सहकुटुंब या सोहळ्यासाठी उपस्थित होते. त्यांनी रोपवेद्वारे रायगडावर पोहोचून छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले आणि अभिवादन केले. यावेळी मनसेच्या प्राथमिक सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेही बोलताना राज ठाकरे म्हणाले की, यावर्षी मी ठरवले की, नऊ तारखेला वर्धापन दिन आहे आणि १९ तारखेला गुढीपाडव्याचा मेळावा आहे. त्यामुळे दोन वेळेस बोलण्यापेक्षा जे काही बोलायचे आहे ते १९ तारखेला एकदाच बोलून टाकू. त्यामुळे आम्ही ठरवले की, पक्ष सदस्य नोंदणी बऱ्याच दिवसांपासून करायची होती. त्यामुळे मनसेच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने पक्ष सदस्य नोंदणी सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. आज महाराष्ट्रातल्या सर्व सैनिकांना माझं आवाहन आहे की, अनेक लोकांना आपल्या पक्षाचे सदस्य व्हायचे आहे. नुसते सदस्य नाही तर त्यांना सक्रिय सदस्य व्हायचं आहे. त्यामुळे ज्या ज्या वर्दळीच्या जागा आहेत, त्या सर्व ठिकाणी आपल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सदस्य नोंदणीचे स्टॉल्स लागली पाहिजेत. तुम्ही लोकांपर्यंत गेले पाहिजे. लोकांशी बोलले पाहिजे. हजारो लोकांना आपल्या पक्षाचे सदस्य व्हायचे आहे. त्यांना तुम्ही सदस्य करून घ्या, असे आवाहन त्यांनी यावेळी मनसैनिकांना केले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# मतदार याद्या शुद्धीकरण : ममतांचा विरोध कशासाठी?

पश्चिम बंगालमध्ये मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणानंतर (एसआयआर) लाखो मतदारांची नावे वगळण्यात आल्याच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी कोलकात्यात धरणे आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनातून त्यांनी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहेत. तथापि, या प्रकरणाकडे केवळ राजकीय संघर्ष म्हणून पाहण्यापेक्षा लोकशाही व्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. कारण मतदार याद्यांचे शुद्धीकरण ही कोणत्याही निवडणूक प्रक्रियेतील आवश्यक आणि कायदेशीर बाब आहे. त्यामुळे या प्रक्रियेविरोधात आंदोलन करणे हे स्वतः लोकशाहीच्या तत्त्वांनाच आव्हान देणारे ठरते. निवडणूक आयोगाने केलेल्या विशेष पुनरीक्षण प्रक्रियेनंतर राज्यातील सुमारे ६३.६६ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. त्यानंतर मतदारांची संख्या ७.६६ कोटींवरून ७.०४ कोटींवर आली आहे. तसेच सुमारे ६० लाख मतदारांची नावे 'तपासणी अधिन' या श्रेणीत ठेवण्यात आली आहेत. या प्रक्रियेचा उद्देश एकच आहे की, मतदार यादीत असलेली बोगस नावे, मृत व्यक्तींची नावे किंवा स्थलांतरित व्यक्तींची नोंद काढून टाकणे. लोकशाहीच्या दृष्टीने हे अत्यंत आवश्यक आहे, कारण मतदार यादीतील अचूकता हीच निवडणुकीच्या पारदर्शकतेची पहिली पायरी असते. भारतीय निवडणूक व्यवस्था जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था मानली जाते. या व्यवस्थेची विश्वासार्हता टिकवण्यासाठी मतदार यादीतील प्रत्येक नाव खरे आणि वैध असणे गरजेचे असते. जर बोगस मतदारांना मतदानाचा अधिकार मिळाला, तर निवडणुकीच्या निकालावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे निवडणूक आयोगाला कायद्याने दिलेल्या अधिकारांनुसार वेळोवेळी मतदार यादीचे पुनरीक्षण केले जाते. ही प्रक्रिया नवीन नाही. प्रत्येक राज्यात आणि प्रत्येक निवडणुकीपूर्वी अशा प्रकारचे पुनरीक्षण होत असते. या पार्श्वभूमीवर ममता बॅनर्जी यांनी केलेले आंदोलन काही प्रश्न निर्माण करते. जर मतदार यादीतील नावे वगळण्याची प्रक्रिया कायदेशीर आणि पारदर्शक पद्धतीने झाली असेल, तर त्यांनी विरोध का करावा? आणि जर काही अनियमितता झाली असेल, तर त्यासाठी कायदेशीर मार्ग उपलब्ध आहेत जसे निवडणूक आयोगाकडे तक्रार करणे, न्यायालयाचा दरवाजा ठोठावणे किंवा पुरावे सादर करणे. परंतु थेट रस्त्यावर उतरून आंदोलन करणे हा मार्ग लोकशाही संस्थांवरील अविश्वास दाखवणारा ठरतो. लोकशाहीत आंदोलन करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. परंतु त्या आंदोलनाचा उद्देश आणि परिणामही तितकाच महत्त्वाचा असतो. जर आंदोलनाचा हेतू लोकशाही संस्थांवर दबाव आणणे किंवा कायदेशीर प्रक्रियांना अडथळा निर्माण करणे असेल, तर ते लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांशी विसंगत ठरते. पण जर स्वतः मुख्यमंत्रीच अशा प्रकारचे आंदोलन करतो त्यावेळेस चुकीचा संदेश जनतेपर्यंत पोहोचतो. यामागे निश्चितच राजकारण आहे. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसची सत्ता अनेक वर्षांपासून आहे आणि मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल झाल्यास त्याचा राजकीय समीकरणांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे काही राजकीय पक्षांना मतदार यादीचे शुद्धीकरण अस्वस्थ करणारे वाटू शकते. विशेषतः जर बोगस मतदार किंवा अनियमित नोंदी त्यांच्या राजकीय फायद्यासाठी उपयोगी ठरत असतील, तर त्या काढून टाकण्याच्या प्रक्रियेला विरोध होणे स्वाभाविक आहे. पण या याद्यांमध्ये बांगलादेशातून आणि पाकिस्तानमधून आलेल्या घुसखोरांची संख्या खूप जास्त आहे. अशा घुसखोरांना ममता बॅनर्जी यांनी मतदार कार्ड, राशन कार्ड, आधार कार्ड, मोफत घर आणि इतर सुविधा दिल्या आहेत, पण हे कृत्य देशविरोधी आहे हे समजून घेतले पाहिजे. म्हणूनच बंगालच्या राजकारणात 'बाहेरचे' आणि 'स्थानिक' असा मुद्दा वारंवार पुढे येतो. मतदार यादीतील बदलांना बंगाली मतदारांचा हक्क हिरावून घेण्याचा कट असे स्वरूप देणे हे भावनिक राजकारणाचे उदाहरण आहे. लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार आहे, परंतु तो अधिकार केवळ वैध मतदारांनाच असतो. जर एखाद्याचे नाव चुकीने वगळले गेले असेल, तर त्यासाठी अपील करण्याची प्रक्रिया आहे. त्यामुळे संपूर्ण पुनरीक्षण प्रक्रियेलाच राजकीय कट ठरवणे हे वस्तुस्थितीपासून दूर जाणारे आहे. खरे पाहता, लोकशाही बळकट करण्यासाठी मतदार याद्या शुद्ध असणे आवश्यक आहे. यामुळे निवडणुकीची पारदर्शकता वाढते आणि जनतेचा विश्वास टिकून राहतो. जर बोगस नावे मतदार यादीत राहिली, तर निवडणूक प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. त्यामुळे निवडणूक आयोगाने केलेले पुनरीक्षण हे लोकशाहीच्या हिताचे पाऊल मानले पाहिजे. पश्चिम बंगालमधील सध्याची परिस्थिती याच प्रश्नावर प्रकाश टाकते. मतदार याद्यांचे शुद्धीकरण हे बॅनर्जींसाठी सोयीचे नसले तरी लोकशाहीची गरज आहे. त्यामुळे या प्रकरणात भावनिक घोषणांपेक्षा तथ्य आणि कायदा यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. लोकशाही टिकवायची असेल, तर मतदार यादीही तितकीच स्वच्छ आणि विश्वासार्ह असली पाहिजे, हेच या संपूर्ण वादातून समोर येणारे सर्वात मोठे सत्य आहे.

# सर्वश्रेष्ठ क्रांतिकारक-सावित्रीमाई फुले

समाजसुधारक आणि क्रांतिकारक यांच्यामध्ये खूप मोठा फरक आहे. तो फरक म्हणजे समाजसुधारक आहे ती परिस्थिती मान्य करून त्यामध्ये काही बदल करणे आवश्यक आहे असे सांगतात तर क्रांतिकारक हे अस्तित्वात असलेली व्यवस्था झुगारून नवीन व्यवस्था तयार करतात. म्हणून आधुनिक भारताच्या थोर क्रांतिकारक म्हणून सावित्रीमाईशिवाय इतिहास पूर्णच होऊ शकत नाही.



गोट्याला शेंदूर।
फासुनी तेलात।
वसती देवात।
दगड तो।

अखिल मानवजातीला शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी लोकांनी शेण माती आणि खरकटे पाणी फेकले ते सुद्धा सावित्रीमाईने समाजासाठी समाजाच्या भल्यासाठी अंगावर घेतले, परंतु स्त्री शिक्षण बंद केले नाही. एक विचार केला तर गजगंड श्रीमंत असलेल्या सावित्रीमाईला वैयक्तीक कोणत्याही प्रकारची अडचण नव्हती. तरीही हालअपेष्टा आणि अवमान सहन केला तो समाजातील अंधकार दूर होऊन समजात ज्ञानाचा व विज्ञानाचा प्रकाश पडण्यासाठी. आज महिला शिकल्या, नोकरी वर लागल्या, पैसा अडका खूप मिळतो परंतु एकदाही सावित्रीमाईची आठवण येत नाही किंवा सावित्रीमाई बाबत माहीतच नाही असा बहुसंख्य वर्ग आहे, आणि काही महिलांना सावित्रीमाईचे नाव माहिती आहे परंतु कार्य नाही. वरील ओळी वाचल्या तर आपल्या लक्षात येते, समाजात अज्ञान आणि अंधश्रद्धा आहेत आणि त्याचे मुख्य कारण आहे ते लोकांच्या मनावर लादलेले देव. जोपर्यंत लोक सत्य परिस्थिती समजून घेणार नाही तोपर्यंत परिवर्तन होणार नाही म्हणून सत्य परिस्थिती सांगण्याचा सावित्रीमाई यांचा नेहमी प्रयत्न होता. अंधश्रद्धा, अज्ञान आणि विषमेतवर त्यांनी प्रहार करून सामाजिक प्रबोधन केले.

धोंडे मुले देती।
नवसा पावती।
लग्न का करीती।
नारी-नर।

नवस केल्याने मूळ-बाळ होत नाही. म्हणजे नवस हे थोतांड आहे. जर नवस केल्याने मूल झाली असती तर नारी आणि नर यांना लग्न करण्याची गरजच नसती. नवस, देव जोपर्यंत समाजामधून जाणार नाही तोपर्यंत समाजामधली अंधश्रद्धा व अज्ञान कायम राहील असे सावित्रीमाई फुले यांना वाटत होते, म्हणून शिक्षणावर भर देऊन शिक्षणाद्वारेच आपण अंधश्रद्धा व अज्ञान दूर करू शकतो, अशी खात्री सावित्रीमाई यांना होती. परंतु सावित्रीमाईमुळे शिकलेल्या महिलांनी सावित्रीमाई कधी वाचल्याच नाही. म्हणून आज स्वतःला सुशिक्षित आणि समजदार समजणाऱ्या महिला अज्ञान व अंधश्रद्धेमध्ये गुरफटून पडल्या आहेत. माणसाचे मागास राहण्याचे काय कारण आहे हे दोनच ओळीत सावित्रीमाई फुले सांगतात...

शुद्र-अतिशुद्र।
अज्ञानाने पछाडले।
देव, धर्म, रुढी अर्चीं।
दारीद्र्याने गळाले।

आणि म्हणून आपला समाज मागास राहिला होता व आजही शिक्षित समाज असला तरी बहुसंख्य लोक वैचारिक दृष्टीने मागास आहेत. आणि वैचारिक मागास लोक आजही मानसिक गुलाम आहेत आणि त्याच गुलामीमध्ये त्यांना आनंद आहे. शिक्षणाचा वापर फक्त नोकरी करून पैसा मिळवणे एवढाच झालेला आहे. शिक्षणातून तर्क, सत्य, संशोधन आणि चिकित्सा होणे आवश्यक असताना ती होत नाही याचे कारण मानसिक गुलामगिरी आणि म्हणून सावित्रीमाई फुले म्हणतात..

पशुत्वाची लज्जा नाही।
त्यालाच मानतो सुखही।
पशुजिवाची लक्षणे ही।
तयास मानव म्हणावे का?
गुलामगिरीचे दुःख नाही।
जराही त्यास जाणवत नाही।
माणुसकी ही समजत नाही।
तयास मानव म्हणावे का?

आज सुशिक्षित समजणारे लोक सुद्धा सावित्रीमाईच्या वरील ओवीमध्ये बरोबर बसतात म्हणजे सावित्रीमाईचे विचार मानव कल्याणाचे विचार होते याची जाणीव लोकांना कधी होणार?

विद्या धन आहे रे।
श्रेष्ठ साऱ्या धनाहून
तिचा साठा जयापाशी।
ज्ञानी मानती तो जन

विद्या अर्थात शिक्षण हे सर्व श्रेष्ठ धन आहे. त्याचे मोल कोणत्याही किंमतीमध्ये होऊ शकत नाही, आणि शिक्षणाचा साठा ज्यांच्याकडे आहे त्याला लोक विद्वान समजतात. परंतु भारतात आजही परिस्थिती उलटी आहे. सुशिक्षित लोक उच्च शिक्षित, विज्ञानवादी लोकांसमोर नतमस्तक न होता अडाणी पाखंडी लोकांसमोर नतमस्तक होतात. अडाणी, पाखंडी लोकांमध्ये दैवशक्ती असते असे त्यांचे मत असते आणि त्या दैवशक्ती साठी अडाणी-पाखंडी व वयाने लहान असलेल्या भोंदुसमोर नतमस्तक होऊन आपली विद्वता अडाणी व अज्ञानी लोकांच्या पायथ्याशी गहाण ठेवतात हीच एक शोकांतिका आहे. सावित्रीमाई यांनी शिक्षणाच्या माध्यमातून अंधश्रद्धा, थोतांड, विषमता यावर प्रहार करून सामाजिक क्रांती केली. शिक्षण फक्त लिहिणे, वाचणे किंवा चांगले कपडे घालणे म्हणजे शिक्षण नाही तर विचारपरिवर्तन म्हणजे शिक्षण होय. आपल्या ज्ञानाचा फायदा समाजाला होणे म्हणजे शिक्षण होय. सर्व समस्येचे मूळ कारण अज्ञान आहे. अज्ञानामुळे अंधश्रद्धा, पाखंड व विषमता निर्माण झाली हे कोणी केले यावर सावित्रीमाई फुले म्हणतात..

नांगर जे धरती। शेती करती
मठ्ठ ते असती। मनू म्हणे
करू नका शेती। सांगे मनुस्मृती
धर्माज्ञा करती। ब्राम्हणास
शुद्र जन्म घेती। पूर्वीची पाप ती
या जन्मी फेडती। शुद्र सारे
विषम रचीती। समाजाची रिती
धुर्ताची ही निती। अमानवीय

समाजाची विषमतावादी व्यवस्था निर्माण करून समाजाचे वैचारिक व आर्थिक शोषण मनुस्मृतीने केले, आणि मनुस्मृतीच सर्व समस्येचे मूळ आहे याची जाणीव सावित्रीमाई फुले यांना होती. आजच्या शिकलेल्या लोकांना याची जाणीव आज झाली? हा खूप गहन प्रश्न आहे. सावित्रीमाई फुले आपल्याला समजल्या असत्या तर देशातील महिला व देशाने जगावर अधिराज्य केले असते. परंतु तेव्हा शेणमाती फेकून सावित्रीमाईचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला आणि आज सावित्रीबाईमुळे शिकून ही सावित्रीमाईचे विचार न घेता सावित्रीमाईच्या कार्याची जाणीव न ठेवता स्वतःला सुशिक्षित व वैचारिक समजणारे किती वैचारिक अपंग आहेत याची जाणीव होते. आठ मार्चला महिला दिनानिमित्त अनेक महिलांनी अनेक लेख लिहिले. अपवाद वगळता महिलांनी आपले स्थान, आपला स्वाभिमान, आपले शिक्षण, कोणामुळे आहे हे सांगण्याची गरजच वाटली नाही. एका शब्दामध्येसुद्धा सावित्रीमाईचा उल्लेख न करणाऱ्या महिलांनी महिला दिन साजरा केला. आपण व्यक्त होतोय, लिहितोय, बोलतोय महिला दिन उत्सवात साजरा कोणामुळे करतो हे जाणीवपूर्वक विसरणे म्हणजे सामाजिक व वैचारिक बेईमानी आहे आणि हे चित्र समाजात आजही आहे. परंतु ज्या सावित्रीमाईमुळे महिलांना शिक्षण, संरक्षण आणि धनप्राप्तीच्या माध्यमातून सुख मिळाले त्या सावित्रीमाईला वाचून त्यांचे विचार घेऊन महिला वागल्या तर खरचं तीच एक मोठी आदरांजली सावित्रीमाईला असेल. आज मोठ मोठे घर झालेत घरामध्ये मोठमोठ्या फ्रेम आहेत परंतु त्या फ्रेममध्ये सावित्रीमाई नाही. आज घरामध्ये मोठ-मोठे कपाट आहेत, कपाटात बसणार नाही एवढ्या साड्या व सौंदर्यप्रसाधने आहेत. परंतु दुःख याचं आहे त्या कपाटात सावित्रीमाई फुलेचे पुस्तक नाहीत. कोणी पायातला काटा काढला त्याची जाणीव ठेवावी ही संस्कृती असताना ज्यांनी काटा मोडूच नाही म्हणून योग्य वाटा दाखवल्या ते लोक किती थोर असतील याचा थोडासा जरी विचार केला तर आपली वैचारिक परिपक्वता दिसून येईल. अंधश्रद्धा व अज्ञान पाळून अनेक महिला अनेक रुढी परंपरा एक महिला म्हणून वैयक्तिक पातळीवर देखील पाळतात. परंतु किमान आठवड्यात, महिन्यात एकता तरी सावित्रीमाईला वंदन करणाऱ्या किती महिला असतील? सावित्रीमाई यांनी शिक्षण सुरु केले हा उद्देश पूर्ण झाला का? पूर्ण नसेल झाला तो पूर्ण करण्यासाठी काय करावे लागेल? महिलांचे त्यासाठी काय योगदान असायला पाहिजे? यावर कीती महिला विचारविनिमय करत असतील. जागतिक पातळीवरचे कार्य व विचार असलेल्या सावित्रीमाईचे कार्य व विचार आजही घराघरांत पोहचले नाही याचे मुख्य कारण देशातील बहुसंख्य लोक हे वैचारिक दृष्टीने कमकुवत आहेत. पाखंड, असत्य, अज्ञान व अंधश्रद्धाविषयक माहिती लवकर त्यांच्या डोक्यात जाते परंतु विज्ञानवादी व परिवर्तनवादी विचार आजही त्यांना पचत नाही, कारण त्यांची वैचारिक पातळी तेवढी परिपक्व झाली नाही. परंतु जर सावित्रीमाईचे विचार व कार्य आज समजून घेतले नाही तर पुन्हा एकदा अंधश्रद्धा व अज्ञानाचा पगडा महिलांच्या डोक्यावर येईल तेव्हा मात्र त्यातून बाहेर येणे खूप अवघड असेल. पाखंड व अंधश्रद्धा पसरवणाऱ्या कार्यक्रमामध्ये महिलांचा सहभाग आजही जास्त आहे परंतु वैचारिक कार्यक्रमात महिलांची उपस्थिती नसते आणि हाच विरोधाभास एक दिवस देशातील लोकांना घातक ठरेल म्हणून आपल्याला कशाची आवश्यकता आहे हे ओळखून आपण काम केले पाहिजे. सत्य, विज्ञान व तर्क स्वीकारुन आपण वैचारिक प्रगल्भता वाढवली तरच शिक्षण व सावित्रीबाई फुले यांनी घेतल्या परिश्रमाचे सार्थक होईल. स्मृतीदिनी सावित्रीमाई फुले यांच्या विचारास व कार्यास विनम्र अभिवादन

-विनोद सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव, ता. मेहकर
मो. ९१३०९८९३००

# सावित्रीबाई फुलेंचे कार्य समस्त मानव जातीला भूषणावह



महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचा आज स्मृतिदिन. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी साताऱ्याजवळील नायगाव या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडूजी नेवसे असे होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. ज्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर पडायचे बंधन होते, त्या काळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. असे असले तरी सावित्रीबाई मात्र निडर स्वभावाच्या होत्या. त्या लहान असताना एका दुबळ्या मुलाचे फुले पळवणाऱ्या धटिंगणाला त्यांनी अद्दल घडवली होती. तसेच त्यांच्या घरासमोरील झाडावर असणाऱ्या घरट्यातील पक्षांची अंडी खाणाऱ्या नागाला त्यांनी ठेचून मारले होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महात्मा जोतीराव फुले यांच्याशी झाला. जोतीराव तेंव्हा तेरा वर्षाचे होते. त्याकाळी बालविवाहाची परंपरा होती. अगदी पाळण्यात देखील विवाह लावले जायचे.

महात्मा जोतीराव फुले म्हणजे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक. जोतीरावांना मातृप्रेम लाभले नाही. त्यांच्या मावस भगिनी सगुणा यांनी त्यांचा सांभाळ केला. सगुणा इंग्रज अधिकाऱ्याकडे दाई म्हणून काम करायच्या. त्यामुळे त्यांना इंग्रजी कळायचे. आपल्या जोतीरावने देखील इंग्रजी फाडफाड बोलले पाहिजे असे त्यांना वाटायचे. त्यांनी जोतीरावांना शिकण्यास प्रेरित केले. जोती-रावही शिकले नंतर जोतिरावांनी सावित्रीबाई यांनाही शिकवले. मुलींच्या शिक्षणाचे महत्व जाणून मुलींसाठी शाळा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ते नेहमी म्हणत एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते म्हणून १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाई फुले मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागल्या. या शाळेत सुरवातीला दोन मुली होत्या वर्षअखेर या शाळेतील मुलींची संख्या ४० ते ४५ पर्यंत पोहचली. या शाळेमुळे शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्री वर्गास ज्ञानाची कवाडे खुली झाली. पण हे चांगले काम त्याकाळातील सनातनी वर्गास रुचले नाही. मुली शाळेसाठी घराबाहेर पडू लागल्याने धर्म बुडाला अशी आरोळी ठोकत या सनातनी लोकांनी सावित्रीबाई व जोतीरावांच्या या महान कार्यास विरोध केला. सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर शेण गोळे फेकले. काहींनी तर अंगावर हात टाकण्याचाही प्रयत्न केला, पण फुले दांपत्य डगमगले नाही. घेतलेला वसा त्यांनी सोडला नाही. कितीही विरोध झाला तरी ध्येयापासून ते विचलित झाले नाही. जिद्दी व ध्येयवादी फुले दांपत्यांनी ज्ञानदानाचे आपले पवित्र कार्य चालूच ठेवले. जोतिरावांनी काढलेल्या शाळेत फुले दांपत्य व अन्य शिक्षक जीव ओतून शिकवत. विद्यार्थ्यांशी ते एकरूप होत त्यामुळे त्यांच्या शाळेची प्रगती लक्षणीय होती. त्यांच्या शाळेविषयी पुणे ऑब्जर्व्हर या दैनिकामध्ये २१ मे १८५२ मध्ये लिहिले होते, जोतीराव फुलेंच्या शाळेतील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने जास्त आहे कारण या शाळेत मुलींना शिकवण्याची जी व्यवस्था आहे ती मुलांच्या शासकीय शाळेपेक्षा चांगली आहे. १८६३ मध्ये फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीबाई त्याच्या प्रमुख होत्या.

१८८५ पर्यंत ३५ विधवा ब्राह्मण स्त्रिया त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे सावित्रीबाईंनी केली. १८७४ साली काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवा त्यांच्या घरात आल्या. या काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले त्या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंतला शिकवून त्यांनी डॉक्टर बनवले. सण १८७७ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. या दुष्काळात फुले दांपत्यांनी लोकांना खूप मदत केली. त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी जेवणाखाण्याची सोय केली. सावित्रीबाईंनी केशवपन पद्धत बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करुन नाभिकांचा संप घडवून आणला. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे वाहिली. सावित्रीबाई फुले या मोठ्या साहित्यिकही होत्या. काव्य-फुले व बावनकशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. १८९६-९७ साली पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला होता. प्लेग या जीवघेण्या आजाराने अनेकांचा जीव घेतला. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहीत असूनही सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांची सेवा करु लागल्या. त्यांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली त्यातून १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई फुले यांचे कार्य समस्त मानवजातीला भूषणावह आहे म्हणूनच स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

-श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# ...तरंच यशस्वीपणाचं पाऊल टाकता येईल?

काही लोकांना सवय असते, नुसते उपद्रवी कारनामे करायची. आपल्या बुद्धीचा वापर ते अशाही पद्धतीनं करीत असतात. परंतु बुद्धी आहेच तर नुसते उपद्रवी उद्योग करण्याऐवजी कामधंदे करावे. असे काहींचे मत आहे. जेणेकरुन कामात लक्ष लागून सुकार्य कार्य घडेल. उपद्रवी कार्य घडणार नाही. परंतु कधीकधी उपद्रवी कार्य करणंही शुभ लक्षण ठरु शकते. उदाहरणार्थ थॉमस अल्वा एडीसन.

थॉमस अल्वा एडीसन हे असे व्यक्तीमत्व होते की त्यांनी आपल्या शेतीतच असलेल्या धानाच्या गंजीला आग लावली होती. ते उपद्रवीच कार्य होतं. दुसऱ्या त्यांच्या कार्याबाबत बोलायचं झाल्यास त्यांनी रेल्वेत केलेले प्रयोग. त्या प्रयोगानंतरही रेल्वेगाडीला आग लागली होती. परंतु ते जरी उपद्रवी कार्य असलं तरी त्यातून वीज निर्माण होणं हे हे उपयोगी कार्य घडलं. त्यामुळंच कोणत्याही कार्याला उपद्रवी कार्य म्हणताच येत नाही.

कार्य कोणतंही असो, मग ते उपयोगी असो की उपद्रवी असो, कार्य कार्यच असतं. कधी त्या कार्याला कोणी वाईटही ठरवतात तर कोणी त्या कार्याला चांगलंही मानतात. काल वाईट असलेली कृती कदाचीत प्रदीर्घ कालावधीनंतर चांगलीही वाटू शकते आणि काल चांगली असलेली कृती कोणाला प्रदीर्घ कालावधीनंतर वाईटही वाटू शकते. तसं पाहिल्यास आज राजालाही शिव्या हासडणारे भरपूर आहेत. जरी त्याचं कार्य चांगलं असलं तरी. उदाहरण द्यायचं झाल्यास हापकिन या शास्त्रज्ञाचं देता येईल. ज्यावेळेस पुण्यामध्ये प्लेग पसरला होता. त्यावेळेस हापकिन या शास्त्रज्ञाने प्लेगवर अथक परिश्रम करुन प्लेगची लस शोधून काढली होती. मग ती लस कोणीच घेईना. कारण लोकांचा त्या लसीवर विश्वास नव्हता. मग काय, आपण सुरक्षित लस तयार केली आहे, हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी सार्वजनिकरित्या आधी स्वतःला इंजेक्शन टोचून दाखवले. ही हापकिनची कृती उपद्रवीच होती. परंतु तद्नंतर तीच कृती जगाच्या दृष्टीनं कल्याणकारी ठरली. दुसरं उदाहरण कैकेयीचं देता येईल. तिनं रामाला वनवासात जा म्हणणं ही कृती उपद्रवीच होती. परंतु त्यातून चांगलं कार्य घडत गेलं. ते कार्य म्हणजे जगाला त्रास देणाऱ्या तमाम घटकाला नष्ट करता आलं. महाभारताचंही तेच उपहासात्मक विनोदाचं उदाहरण म्हणजे नरो वा कुंजरवा. तिही उपद्रवीच कृती. परंतु त्यानं द्रोणाचार्यसारखा व्यक्ती मारला जाणं हे पांडवांच्या दृष्टीनं चांगलं कार्य होतं.

एक महान व्यक्ती जेव्हा घडतो. त्याच्या विचारांची पुनर्बांधणी होते, तेव्हा त्याला बऱ्याच कृती कराव्याच लागतात. कधी समाज रोषाला समोरे जावे लागते. परंतु तसं जात असतांना जरी त्याचं काही चुकत असेल तर चूक मानून पुढचं पाऊल टाकावंच लागतं. जर ते टाकलं नाही तर कार्यभाग संपतो. समाजात असेही घटक असतातच की जे कोणी पुढे जात असेल तर त्यांची पावले थांबवतात. कोणी जीवंत समाधी घ्यायला भाग पाडतात. नंतर त्यांचा उदोउदो करतात. कोणी इंद्रायणीत संबंध गाथाच बुडवतात. मग तीच गाथा पाण्यावर तरंगत होती हेही सिद्ध करतात.

एक शास्त्रज्ञ वा महान व्यक्ती तोच बनू शकतो की जो समाजाचा रोष सहन करतो. स्वतः संकटं झेलतो. लोकांचे बोलणे ऐकतो आणि आपली वाटचाल करीत असतो. सावित्रीबाईंनी ज्यावेळेस महिला वर्गाला पुण्यात शिकवलं, तेव्हा तिच्यावर शाळेत शिकवायला जात असतांना शेणाचा व धसकटाचा मारा सहन करावा लागला. याचाच अर्थ महान जर बनायचं असेल तर 'कुत्ते भोके हजार, हाथी चले बाजार' असं वागायलाच हवं महान बनणाऱ्यांनी. कारण कधी कधी कुणाचे समज हे गैरसमज ठरु शकतात. कोणी स्वतःला श्रेष्ठ समजण्याच्या नादात दुसऱ्यांना कनिष्ठ समजत असतात. वैचारीक स्वतंत्र्यता असूनही त्यानं असं वागावं, त्यानं तसं वागावं असं सांगीतलं जातं. मग विचारांच्या फैरी व वादाच्या फैरी झडत असतात. एका विनोदात्मक लेखनावर एक मित्र म्हणतो,

विनोद म्हणजे निखळ मनोरंजन. समोरच्याला न दुखवता, वाईट न वाटू देता त्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे म्हणजे विनोद होय. पण या लेखात विनोदाची सांगळ तू चुकीच्या प्रसंगाशी जोडली आहे. कोणाचा मुत्यू किंवा तिची बातमी हा विनोद असूच शकत नाही.

रणांगणावर अश्वत्धामाचा मृत्यू झालेला आहे, हा विनोद नसून ती अफवा होती, हवं तर ते पांडवांनी रचलेलं षड्यंत्र होते. कारण त्यांना माहिती होते की आचार्य द्रोणाचार्य हे सर्वश्रेष्ठ योध्दा आहे, पण त्याही आधी ते एक वडील आहेत. कारण कोणत्याच पित्याला त्याच्या मुलाच्या मृत्यूची अथवा विरहाची बातमी ऐकून आंनद अथवा विनोद होणारच नाही. तेव्हा तु दिलेला संदर्भ, उदाहरण है विनोद या शब्दाच्या व्याख्याला अनुसरून नाही. हवं तर तू दुसरं समर्पक असं उदाहरण दे, जेणेकरून ते या लेखाला उचित न्याय देईल.

विनोदात्मक भाषेत सांगायचं झाल्यास विनोद हे पाहात नाही की पुढील व्यक्ती हा मृत्यू पावलेला आहे. कधीकधी मृत्यूच्या वेळेसही लोकं विनोद करुन जातात. मग म्हणावं लागतं की चूप बसा, नाहीतर कोणी ऐकून घेईल. विशेष म्हणजे मृत्यू हा घटक जर सुखदता देणारा असो वा नसो विनोद हा अगदी सहजच घडून येत असतो.

महत्वाचं सांगायचं म्हणजे कोणत्याही गोष्टीला दोन बाजू असतात. आपण फक्त एकच बाजू समजून घेतो. दुसरी बाजू लक्षातच येत नाही. तसेच कोणतेही प्रसंग कुणासाठी थांबत नाही. जर एखादा वाईट प्रसंग घडलाच तर लागलीच त्यावर दोन पाऊल मागं टाकून पुढची वाट धरावी लागते. त्याचा बाऊ करीत कार्य करणं सोडून द्यावं लागत नाही. तरंच जीवनात यशाच्या शिखरावर जाता येतं. पश्चातापाचे अश्रू निरंतर रडत वा गात बसावे लागत नाही. कारण काळ हा कुणासाठीही थांबत नाही. तो पुढे पुढे सरकत असतो. म्हणूनच कार्य करतानाही माणसानं हेच लक्षात घ्यायचं असतं. मग ते कार्य उपयोगी का असेना धा ते कार्य उपद्रवी का असेना. त्याची समीक्षा समाज करेल. कारण विधात्यानं बरंवाईट म्हणणाऱ्यांचाही एक वर्ग बनवला आहे. तो वर्ग वाईट म्हणणारच नसेल तर बरंवाईट कसं कळेल. त्यामुळंच कोणी काहीही म्हणोत. आपलं बोलणं, आपलं वागणं, आपलं हसणं, आपलं लिहिणं संपवायचं नसतं. कारण ही सृष्टी आहे. या सृष्टीतही एक दिवस कोणीतरी मरणार आहे आणि कोणीतरी जन्म घेणार आहे. म्हणूनच समाजाच्या कोणत्याही कृतीचा बरावाईट परीणाम स्वतःवर होवू देवू नये. कार्य निरंतर करीत राहावे. मग ते कार्य चांगले असो वा नसो. कारण काल रामाची कृती जरी चांगली असली तरी आज त्या रामावरही लांच्छन लावणारे जगात कमी नाहीत. यात शंका नाही. म्हणूनच कार्य करीत राहावे. स्वतःला कार्यात गुंतवून ठेवावे व पुढे जाण्याची दिशा ठरवावी. मागचे काही घडलेले बरेवाईट विसरावे. जेणेकरुन पुढची पायरी चढता येईल. यशस्वीपणानं आणि तेवढ्याच ताकदीनं हे तेवढंच खरं आहे.

-अंकुश शिंगाडे
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# विश्वचषक विजयाचा नांदेडमध्ये जल्लोष

## अमर राजूरकर-दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून मोठ्या पडद्यावर अंतिम सामना



**नांदेड (प्रतिनिधी)** -क्रिकेट विश्वचषकाच्या अंतिम फेरीत हिंदुस्थानने न्यूझीलंडला चारीमुंड्या चित करीत विजेतेपद पटकावल्याचा आनंद नांदेडकरांनी जल्लोषात साजरा केला. माजी आमदार अमरनाथ राजूरकर आणि ॲड. दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून कुसुम सभागृहात मोठ्या पडद्यावर लावण्यात आलेला सामना पाहण्यासाठी शेकडो क्रीडारसिकांनी गर्दी केली होती. यावेळी राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धांमध्ये नांदेड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केलेल्या सुमारे २०० आजी-माजी क्रिकेटपटूंचा आकर्षक स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

भाजपा नांदेड महानगरच्यावतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. नांदेडकरांना स्टेडियममध्ये बसल्याचा आनंद मोफत अनुभवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. मोठ्या पडद्यावरील प्रक्षेपणाची सुरुवात नांदेड भूषण संतबाबा बलविंदरसिंघ यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवीण साले होते.

यावेळी कुबेरनगरीचे सतीश सुगनचंद शर्मा, डॉ. सचिन उमरेकर, व्यंकटेश जिंदम, नगरसेवक आशिष नेरलकर व राजू यन्नम, बागड्या यादव, शिवप्रसाद राठी, धीरज स्वामी, तौसिफ अहमद, धनंजय नलबलवार, निलेश कुंटूरकर, चंचलसिंघ जट, राजन जोजारे, कर्मचारी नेते रामेश्वर वाघमारे, तहसीलदार रघुनाथसिंह चौहान, रुपेश व्यास, महेंद्र तरटे, राजेश देशमुख, हरजिंदरसिंघ संधू, संतोष मानधनी आदींची प्रमुख उपस्थिती होती. संयोजक दिलीप ठाकूर, सुरेश लोट, कामाजी सरोदे, सुरेश शर्मा, प्रकाश उंटवाले, अरुण काबरा, सुरेश निल्लावार यांनी मान्यवरांचा सत्कार केला. सविता काबरा, स्नेहलता जायस्वाल, शीला जांभळे व रागिणी जोशी, सुषमा हुरणे यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थित सर्व महिलांचे स्वागत माजी नगरसेविका जयश्री ठाकूर यांनी केले. कार्यक्रमाचे रंगतदार सूत्रसंचालन शीतल खांडील व लक्ष्मण खाडे यांनी केले.

या निमित्ताने प्रथमच एकत्र आलेल्या नांदेडच्या सुमारे २०० आजी-माजी क्रिकेटपटूंचा क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. नंदू कुलकर्णी यांच्या हस्ते आकर्षक स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. त्यामध्ये नांदेड भूषण ॲड. मिलिंद एकताटे, राजीव किवळेकर, सुधाकर पाढरे, शिवाजी डहाळे, रतन साडेगावकर, मंगेश कामतीकर, श्याम आडे, बालाजी गिरगावकर, रणजितसिंघ चिरागिया, परविंदरसिंघ रामगडीया, मोहनसिंघ रोडगी, राजू जाधव, रवी पाटील, शंकर नांदेडकर, शैलेश देशमुख, नरेंद्र पटवारी, राजा गायकवाड, प्रसन्न घोगरे, राम शेळके, सचिन चौहान, संतोष औंढेकर, वसंत साबळे यांच्यासह अनेक खेळाडूंचा समावेश होता.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शिवसेना ठाकरे गटाकडून अन्नदान

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**- शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने सिडकोमध्ये तिथीनुसार छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. शिवजयंतीनिमित्त अवास्तव खर्चाला फाटा देत मिरवणूक टाळून पाच क्विंटल अन्नदान करण्यात आले.



शिवसेना उध्दव ठाकरे गटाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सिडको, हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास महाअभिषेक व शिवसेना पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. शिवसेना शहर सिडको प्रमुख जितूसिंघ टाक व पदाधिकारी यांनी शिवजयंती साजरी करण्यासाठी पुढाकार घेतला. यावेळी जय भवानी, जय शिवाजी आदी घोषणा देण्यात आल्या.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी तिथीनुसार शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने सिडको भागात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. तसेच हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गुरू किरण चेरकर यांच्या हस्ते मंत्रोचार पद्धतीने विधीवत पूजन करून पुतळ्यास महाअभिषेक करण्यात आला. शिवसेनेचे पदाधिकारी दक्षिण जिल्हा प्रमुख भुंजगराव पाटील डक, शिवसेना जिल्हाप्रमुख बबन बारसे, महानगर प्रमुख प्रकाश मारावार, नवज्योतसिंघ सिध्दु, ज्येष्ठ पदाधिकारी निळकंठ काळे पाटील, शाखा प्रमुख सोनु नवघरे, सुरज फटाले, शिवाजी सूर्यवंशी, संजय साबणे, बाळू पंडित, उद्योजक नरेश राठी, अमोल धानोरकर, धनंजय बोटवे यांच्यासह पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त परिसरात रोषणाई करून भगवे पताके लावण्यात आले. जयंती सोहळा यशस्वीतेसाठी शहरप्रमुख जितुसिंग टाक, माजी शहरप्रमुख निवृत्ती जिंकलवाड, कामगार सेनेचे जिल्हाप्रमुख ब्रिजलाल उगवे, तुकाराम पांचाळ, प्रमोद मैड, संदीप जिल्हेवाड जयश्री कंधारे, रणजित टाक व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे राष्ट्रीय फार्मसी शिक्षण दिन उत्साहात साजरा

**लोहा (प्रतिनिधी)**- डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे फार्मसी शिक्षणाचे जनक म्हणून ओळखले जाणारे प्रा. महादेवलाल श्रॉफ यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय फार्मसी शिक्षण दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना फार्मसी शिक्षणाचे महत्त्व, त्याचा इतिहास व विकास याबाबत जागरूक करणे तसेच संशोधन व नवोपक्रमासाठी प्रेरित करणे हा होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पी. पी. आलाबदे यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. एम. एल. श्रॉफ यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. प्रा. एस. एम. अंबोरे यांनी



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. एम. एल. श्रॉफ यांच्या जीवनकार्याबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यांनी भारतातील फार्मसी शिक्षणाच्या विकासासाठी दिलेले योगदान अधोरेखित केले. तसेच विद्यार्थ्यांनी औषध निर्माण क्षेत्रात संशोधन, नवोपक्रम आणि समाजसेवा यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. संस्थेतील प्राध्यापक व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी आपल्या रिसर्च वर्क्सचे प्रेझेंटेशन सादर केले. त्यांनी विविध संशोधन प्रकल्प व पेटंट्सची माहिती देऊन फार्मसी क्षेत्रातील नवकल्पना व संशोधनाचे महत्त्व स्पष्ट केले. या सादरीकरणामुळे विद्यार्थ्यांना संशोधनाची प्रेरणा मिळाली. तसेच भविष्यातील संधींबाबत मार्गदर्शन झाले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. ए. ए. गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. नरेंद्र पत्रे, विभाग प्रमुख प्रा. प्रज्ञा भोसले, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून, फार्मसी शिक्षणाचे महत्त्व आणि संशोधनाची गरज याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली.

# राष्ट्रसंत गाडगेबाबा हे मानवतावादाचे मूल्य रुजवणारे महान निष्काम कर्मयोगी संत होते -बाबाराव विश्वकर्मा

**नांदेड (प्रतिनिधी)** - संत परंपरेच्या माळेतील शेवटचा मणी ठरलेले राष्ट्रसंत गाडगेबाबा हे गोरगरीब, कष्टकरी, कामगार, दलित- पददलित, बहुजन समाजाला जागरूक करीत. समाजात मानवतावादाचे मूल्य रुजवण्याचे महान कार्य राष्ट्रसंत गाडगेबाबा यांनी केले. प्राणीमात्रांना केंद्रभूत ठेवून समाजातील प्रत्येक घटकाला अनिष्ट रूढी, परंपरा, अज्ञान, अंधश्रद्धा, हिंसा, कर्मकांड, व्यसनाधीनता यातून बाहेर काढण्यासाठी त्यांनी आयुष्यभर अथकपणे कार्य केले, असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक, प्रसिद्ध साहित्यिक बाबाराव विश्वकर्मा यांनी केले. भारतीय पिछडा शोषित संघटनेने आयोजित केलेल्या संयुक्त जयंती महोत्सवात ते बोलत होते.




भारतीय पिछडा संघटन, नांदेड आयोजित संयुक्त जयंती समारंभात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वनाथ कोलमकर हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय पिछडा शोषित संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष एस. जी. माचनवार, लक्ष्मण लिंगापुरे, नंदकुमार कोसबतवार, लक्ष्मणराव क्षीरसागर, वक्ते डॉ. राजेश चव्हाण व राष्ट्रसंत गाडगेबाबा विचार जागर पुरस्काराचे मानकरी गंगाधर निमलवार यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना विश्वकर्मा म्हणाले की, महाराष्ट्राच्या संत परंपरेत जगद्गुरू संत तुकाराम महाराजांनंतर दोन शतके समाज जीवनावर आपल्या विचार आणि कृतीचा प्रभाव पाडणारा एकही संत निर्माण झाला नाही. ती पोकळी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात २३ फेब्रुवारी १८७६ मध्ये जन्माला आलेल्या राष्ट्रसंत गाडगे बाबांच्या रूपाने भरून निघाली. त्यांनी तुकाराम महाराजांच्या विचारांचा वसा घेऊन तळागाळातील कष्टकरी, कामकरी, बहुजन समाजाला अंधश्रद्धा, कर्मकांड, अज्ञान यातून बाहेर काढत समाजात मानवतावादाचे मूल्य रुजवण्याचे महान कार्य केले, असेही बाबाराव विश्वकर्मा म्हणाले.

डॉ. राजेश चव्हाण यांनी संत सेवालाल महाराजांचे विचार व कार्य याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संत गाडगेबाबा जीवन कार्य या पुस्तकाचे लेखक गंगाधर निमलवार यांना 'राष्ट्रसंत गाडगेबाबा विचार जागर' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व भूमिका सतिशचंद्र शिंदे यांनी मांडली व सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश चिटकुलवार यांनी केले. शेवटी उपस्थितांचे आभार के. आर. बनसरे यांनी मानले.

# एमजीएममध्ये शास्त्रज्ञ देवधर यांचे व्याख्यान रंगले

**नांदेड (प्रतिनिधी)**- एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागाच्या इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स स्टुडंट चॅप्टर अंतर्गत डीआरडीओचे प्रसिद्ध शास्त्रज्ञ काशीनाथ देवधर यांच्या 'इन्सपायरींग जर्नी ऑफ इंडीयास डिफेन्स प्रीपेअर्डनेस' विषयावरील व्याख्यान उत्साहपूर्ण वातावरणात रंगले.



यावेळी सर्वप्रथम संगणकशास्त्र अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. अर्चना राजूरकर यांनी प्रास्ताविक करून उपस्थित प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपप्राचार्य डॉ. शिरिष कोटगीरे यांनी पाहूण्यांचे फुले आणि गांधी प्रतिमा देऊन स्वागत केले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर भाषणात देवधर यांनी गत चाळीस वर्षातील तीनही संरक्षण दलात लागणाऱ्या शस्त्रांची निर्मिती, त्यांचा वापर तसेच भारताची स्वदेशी शस्त्र निर्मितीत झालेली प्रगती आदी गोष्टींबद्दल दृकश्राव्य माध्यमाच्या मदतीने दीर्घ धांडोळा घेतला.

देवधर यांनी डॉ. एपीजे कलाम यांच्यासोबत काम केले असून, डीआरडीओ येथील कामाचा त्यांना शास्त्रज्ञ म्हणून प्रदीर्घ अनुभव आहे. एपीजे कलाम यांच्या प्रयत्नांमुळे भारतात आधुनिक मिसाईल तंत्रज्ञानाची एक भक्कम पायाभरणी झाल्याचे ते म्हणाले. तसेच संरक्षण दलासाठी लागणाऱ्या शस्त्रांकरिता भारत आत्मनिर्भर झाला असून, भारत मोठा शस्त्र निर्यातदार देश बनला असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

व्याख्यानासाठी प्रोफेसर एमिरेटस डॉ. वाय. व्ही. जोशी, उपप्राचार्य डॉ. शिरिष कोटगीरे, विविध विभागप्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. भाग्यश्री कापरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तर आयईआयची विद्यार्थिनी संपदा उजळंबकर हिने उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयईआय चॅप्टरच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत जिल्हा-तालुकास्तरीय एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** -भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२४-२५ पासून महाराष्ट्र स्तरावर ऑनलाईन पद्धतीने राबवली जात आहे. अनुसूचित जातीतील जे विद्यार्थी ५० टक्केपेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत व ज्या विद्यार्थ्यांना समाज कल्याणच्या शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश मिळालेला नाही अशा विद्यार्थ्यांकरिता स्वाधार योजना राबवली जात आहे. सदरील योजना ही जिल्हास्तर तसेच तालुकास्तरावर राबविण्यात येते.

नुकतेच २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सामाजिक न्याय भवन नांदेड या ठिकाणी एक दिवसीय महाविद्यालयांची मार्गदर्शनपर कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेअंतर्गत कार्यक्रमाचे अध्यक्षपदी संतोष चव्हाण, सहायक लेखाधिकारी समाज कल्याण कार्यालय नांदेड व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती लक्ष्मी गायके, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक तसेच कार्यालयीन अधीक्षक, स. क. नांदेड व स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथील जालिंदर गायकवाड तसेच तालुकास्तरीय प्रमुख पाहुणे म्हणून राजश्री शाहू जुनियर कॉलेजचे प्राचार्य फाजगे, नांदेड जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील प्राचार्य व कर्मचारी, समतादूत कार्यक्रमास उपस्थित होते.

शार्यशाळेचे प्रास्ताविक श्रीमती अंजली नरवाडे, तालुका समन्वयक यांनी केले व श्रीमती गायके यांनी उपस्थित महाविद्यालयातील कर्मचारी यांना सदर योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना सहकार्य करण्यासाठी सूचना दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष संतोष चव्हाण यांनी सदर योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी व जे विद्यार्थी वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहिलेले आहेत, अशा विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

# बालमित्रांच्या बळाने काम करण्याची अधिक प्रेरणा -ॲड. चैतन्यबापू देशमुख

**नांदेड (प्रतिनिधी)** -शाळेच्या दिवसापासून जपलेली मैत्री आजही तितकीच घट्ट असल्याचे पाहून मन आनंदित झाले आहे. कोणत्याही पदापेक्षा बालमित्रांच्या बळाने काम करण्याची मला अधिक प्रेरणा मिळाली, अशी भावनिक प्रतिक्रिया ॲड. चैतन्य बापू देशमुख यांनी दिली. वजीराबाद येथील पायल प्लाझा होकर्णे निवास येथे प्रज्ञा, प्रतिभा निकेतन शाळा होळी, नांदेड येथील वर्ग मित्रांनी आयोजित केलेल्या सत्कार प्रसंगी ते बोलत होते.



इ. स. १९८४ वर्षाच्या दहावी वर्गातील वर्ग मित्रांनी ॲड. चैतन्य बापू देशमुख यांची भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांच्या सर्व वर्ग मित्रांनी एकत्र येऊन त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

बापूंची बालमैत्री, पक्षनिष्ठा कायम असल्यामुळे आज भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाली, याचा आम्हा सर्व मित्रांना अभिमान आहे. यापुढे आम्हा सर्व मित्रांना आपण आमदार झाल्याचे पाहायचे आहे. हे पाहत असताना कोणत्याही बालमित्रांना दुर्लक्षित करणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त करून उपस्थित मित्रांनी बापूंना भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी अरुणा होकर्णे व छाया लाभशेटवार, विजय होकर्णे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. यावेळी बापूंना शुभेच्छा देण्यासाठी कितीतरी वर्षानंतर एकत्र आलेले वर्गमित्र आनंदात भारावून गेले होते. यावेळी अरुणा होकर्णे, छाया लाभशेटवार, गणेश धम्पलवार, अनिल गाडे, विजय होकर्णे, ॲड. संजय देशमुख, संजय बोधणे, अजय देव, प्रल्हाद आयनेले, हरी धोपटे, दिनेश चव्हाण, अजय साकळे, राम जकाते, अरविंद चिंतावर आदींची उपस्थिती होती.

# नवीन सेवार्थ प्रणाली ई-बील संदर्भात प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** - जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत नांदेड जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी नवीन सेवार्थ प्रणाली ई-बील संदर्भात प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १० मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी परिसरातील कॅबिनेट हॉल, नियोजन भवन, येथे करण्यात आले आहे. तरी लेखा विभागातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी या प्रशिक्षणास उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी विक्रम देशमुख यांनी केले आहे.

नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील आहरण व संवितरण अधिकारी यांचे अधिकारी-कर्मचारी यांच्यासाठी मंगळवार १० मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

संबंधित या प्रशिक्षण कार्यक्रमात नवीन सेवार्थ प्रणालीच्या कार्यपद्धती, अद्ययावत वैशिष्ट्ये तसेच व्यवहारातील अंमलबजावणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणात अपर कोषागार अधिकारी वैशाली ताटपल्लेवार, अपर कोषागार अधिकारी नामदेव राठोड, नियुक्त मास्टर ट्रेनर तथा कनिष्ठ लेखापाल शंकर दुमाने, लेखा लिपीक प्रमोद शिंदे, बसवेश्वर वाळके, सुनिल संगेवार आदी यां मार्गदर्शन करणार आहेत.

# श्रीवेद संस्थेच्यावतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार

**नांदेड (प्रतिनिधी)**- महिला दिन सन्मान हा महिलांच्या कर्तृत्वाचा, संघर्षाचा आणि समाजातील योगदानाचा गौरव करण्याचा दिवस आहे. यामुळे श्रीवेद संस्थेने या दिवशी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सब रजिस्टर अनिता मस्के, नगरसेविका शांभवी साले, नांदेडचे जिल्हा प्रशिक्षण अधिकारी डॉ. किरण रापतवार, सामाजिक कार्यकर्त्या सौ. आरती पुरंदरे व दैनिक प्रजावाणीच्या अनुजा डोईफोडे यांची उपस्थिती होती.



तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मारोतीराव कंठेवाड, संस्थेचे अध्यक्ष एस. जी. चांडोळकर आणि कार्यकारी संचालिका सौ. सविता कांठेवाड यांच्या वतीने सर्वप्रथम आई तुळजा भवानीच्या प्रतिमेचे पूजन करून व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. याप्रसंगी संस्थेच्या वतीने प्रमुख पाहुणे व उपस्थित महिलांचा पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी अनुजा डोईफोडे यांनी स्त्रियांनी आर्थिक बचत म्हणजे आपल्या उत्पन्नातून काही रक्कम भविष्यासाठी जतन करून ठेवणे यामुळे अचानक येणाऱ्या गरजा आपत्कालीन परिस्थिती किंवा भविष्यातील उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी मदत होते. यासाठी श्रीवेद संस्थेत ठेवीवर आकर्षक व्याजदर दिले जाते. त्यामुळे सर्व महिलांनी प्रत्येक महिन्याच्या उत्पन्नातून काही टक्के रक्कम श्रीवेद संस्थेत जमा करावी, असे आवाहन केले.

अरुंधती पुरंदरे यांनी महिलांची आर्थिक प्रगती म्हणजे कुटुंब आणि समाजाच्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे, असे सांगितले. नवनिर्वाचित युवा नगरसेविका शांभवी साले यांनी स्त्री आणि पुरुष यांना कायद्यापुढे समान मानले जाते. त्यामुळे महिलांना काम करण्याचा आणि पुरुषाइतकेच वेतन मिळण्याचा अधिकार आहे याची जाणीव सर्व महिला सभासदांना करून दिली.

याप्रसंगी संस्थेच्या कार्यकारी संचालिका सौ. सविता कंठेवाड यांनी आजची स्त्री केवळ कुटुंबाची काळजी घेणारी नाही, तर ती कुटुंबाच्या आर्थिक प्रगतीतही महत्त्वाची भूमिका बजावत आहे. घर चालवताना खर्चाचे नियोजन करणे, बचत करणे आणि योग्य ठिकाणी गुंतवणूक करणे हे महिलांच्या हातून उत्तम प्रकारे घडते. जर प्रत्येक महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली तर तिचे कुटुंब आणि समाज दोन्ही मजबूत होतील. म्हणूनच आजच्या महिला दिनानिमित्त आपण सर्वांनी आर्थिक साक्षरता वाढवण्याचा आणि बचतीची सवय लावण्याचा संकल्प करूया. सौ. सविता कंठेवाड यांनी संस्थेची दिवसेंदिवस प्रगती होत असून, शहरातील जनसामान्यांच्या मनात विश्वास निर्माण केल्याचे सांगून यापुढेही संस्थेला सहकार्य द्यावे, असे आवाहन केले.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)**- विद्यार्थ्यांनी केवळ पदवीसाठी नव्हे, तर देशसेवेच्या समर्पक भावनेतून संशोधन आणि नवकल्पनांवर भर द्यावा. विज्ञानाच्या बळावरच आपण समर्थ आणि सशक्त भारत घडवू शकतो, असे प्रतिपादन डॉ. काशीनाथ देवधर यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलाच्या वतीने 'राष्ट्रीय विज्ञान दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विज्ञान आणि आत्मनिर्भर भारत या विषयावर आयोजित या विशेष कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून डीआरडीओ पुणे येथील माजी शास्त्रज्ञ आणि सुप्रसिद्ध 'गन एक्सपर्ट' डॉ. काशीनाथ देवधर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन होते.

आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानात डॉ. देवधर यांनी भारताच्या संरक्षण सज्जतेचा आढावा घेतला. ते म्हणाले की, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या नेतृत्वाखाली भारताने क्षेपणास्त्र क्षेत्रात जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवला आहे. पृथ्वी, आकाश, अग्नी मालिका आणि ब्रह्मोससारख्या क्षेपणास्त्रांमुळे आपली ताकद वाढली आहे. शत्रूची रडार यंत्रणा उद्ध्वस्त करणारे 'रुद्रम' आणि प्रगत 'अग्नी-६' मुळे भारत आता अधिक सुरक्षित आहे.

डॉ. देवधर यांनी आपल्या कारकिर्दीतील महत्त्वाचे अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले. डॉ. कलाम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष कारगिल युद्धाच्या काळात काम करण्याची संधी मिळणे, हा आयुष्यातील अमूल्य ठेवा असल्याचे त्यांनी सांगितले. भारतीय जवानांच्या सुविधेसाठी 'जी बजुका' गनचे वजन २६ किलोवरून १४ किलोपर्यंत कमी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांच्या हातून घडले, ज्याचा त्यांना सार्थ अभिमान आहे. संरक्षण सिद्धतेवर आतापर्यंत १०३१ हून अधिक व्याख्याने देऊन त्यांनी तरुणांमध्ये राष्ट्रप्रेमाची ज्योत पेटवली आहे.

याप्रसंगी व्यासपीठावर विज्ञान व तंत्रज्ञान अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. शैलेश वाढेर, रसायनशास्त्र संकुल संचालक डॉ. संगीता माकोने, समन्वयक डॉ. अविनाश पुयड यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला डॉ. ज्ञानेश्वर वानखेडे, डॉ. चैतन्या, डॉ. सुहास पाठक, डॉ. गट्टानी, डॉ. पेकमवार, डॉ. यशवंत जोशी यांच्यासह मोठ्या संख्येने प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. संगीता माकोने यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे नियोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रमुख पाहुणे डॉ. काशीनाथ देवधर यांचा विद्यापीठाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

# शिवार

सध्याच्या स्थितीत तापमानात वाढ होत आहे. त्याचा परिणाम जनावरांचे आरोग्य, प्रजनन, चयापचय क्रिया, आहार, दूध उत्पादन आणि गुणवत्तेवर होत आहे. बदलत्या वातावरणानुसार जनावरांच्या दैनंदिन व्यवस्थापनातही बदल करणे आवश्यक आहे. उन्हाळ्यात दूध उत्पादनात सरासरी १० ते ३० टक्के घट होते. त्याचबरोबर दुधाची गुणवत्ता देखील खालवते. सर्वसाधारणपणे मार्च ते जून महिन्यात सभोवतालचे जास्त तापमान आणि आर्द्रता यामुळे जनावरांची खाद्याचे सेवन करण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात खालावलेली असते. त्याचा परिणाम दूध उत्पादनावर व गुणवत्तेवर होतो. दुधातील प्रथिने (प्रोटिन्स) हा महत्त्वपूर्ण घटक उन्हाळ्यातील तीव्र तापमानामुळे कमी होतो.

# उन्हाळ्यात गायींचे आरोग्य कसे राखाल?



## बदलत्या वातावरणानुसार दैनंदिन व्यवस्थापनातही बदल करणे आवश्यक

### गायीच्या दुधातील प्रथिने

अघुलनशील दुधातील प्रथिनांना केसीन म्हणतात. ते दुधाच्या प्रथिनांपैकी सुमारे ८० टक्के असतात. केसीन दुधाला पांढरा रंग देते, चीज बनविण्यासाठी हे खूप आवश्यक असते. दुधातील विद्राव्य प्रकारचे प्रथिने म्हणजे व्हे प्रोटीन, जे दुधाच्या प्रथिनांच्या सुमारे २० टक्के असतात. व्हे प्रोटिनमध्ये ल्युसीन, आयसोल्यूसीन आणि व्हॅलिन सारखे ब्रॅन्चड-चेन अमिनो ॲसिड असतात.

### केसीनचे प्रकार

- » दुधात अघुलनशील प्रथिने असलेले केसीन हे बहुतेक (८० टक्के) असते. केसीन हे फॉस्फोप्रोटीनच्या गटातील आहे. त्याचे चार भागांमध्ये वर्गीकरण केले आहे.
- » अल्फा-केसिन : या प्रकारचे केसिन दुधात मुबलक प्रमाणात असते. ते दही आणि चीजच्या निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते.
- » बीटा-केसिन : बीटा-केसिनचे दोन मुख्य प्रकार A१ आणि A२ आहेत. A१ बीटा-केसिन हे आरोग्यास हितकारक नसते. A२-बीटा केसिन हे पचण्यास सोपे असते.
- » कप्पा-केसिन (के-केसिन) : दुधातील केसिन प्रोटीन कॉम्प्लेक्सचे बिल्डिंग ब्लॉक्स असलेल्या केसिन मायसेल्सची निर्मिती आणि स्थिरीकरणात कप्पा-केसिन महत्त्वाची भूमिका बजावते. हे केसिन चीज बनवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.
- » गॅमा-केसिन : हे दुधातील प्रथिने बीटा-केसिनच्या विघटनानंतर तयार होते. संपूर्ण केसिनच्या ३ टक्के असते.

### प्रथिनांचे आरोग्यदायी फायदे

दुधातील प्रथिने स्नायूंना मजबूत बनविण्यास मदत करतात. हाडांच्या आरोग्यासाठी प्रथिने, कॅल्शिअम, फॉस्फरस आणि जीवनसत्त्व के-२ आवश्यक आहेत. हे सर्व पोषक घटक दुधात आढळतात. म्हणूनच, दुधाचे सेवन हाडांसाठी फायदेशीर आहे. ऑस्टियोपोरोसिसला प्रतिबंधित करते. प्रथिने आणि इतर पोषक तत्त्वांनी समृद्ध असलेले दूध पिल्याने भूक कमी होण्यास मदत होते. वजन नियंत्रित राहते. दुधाचे सेवन हे रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करते. दुधातील इम्युनोग्लोबुलिन सारखी प्रथिने, रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास महत्त्वाची भूमिका निभावतात. दुधामधील उच्च-गुणवत्तेच्या प्रथिनांमध्ये चयापचय वाढवणारे घटक असतात, तसेच ते दिवसभर अखंड ऊर्जा पुरवठा करतात. दुधातील प्रथिने रक्तदाब नियंत्रित करण्यास, हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आरोग्यास हितकारक आहेत, यासंबंधात दुधाचे सेवन हे आपल्या फॅमिली डॉक्टर यांच्या सल्ल्याने करावे.

### प्रथिनांवर परिणाम करणारे घटक

दुधाच्या प्रथिनांच्या प्रमाणात बदल होण्याची अनेक कारणे आहेत. पशू आहाराशी संबंधित नसलेल्या घटकांपैकी एक म्हणजे जनावरांची आनुवंशिकता. आपल्या गोठ्यामध्ये उच्च आनुवंशिक गुणवत्ता असलेली गाय निवडावी. दुधातील प्रथिनांचे प्रमाण केवळ जनावरांच्या वेगवेगळ्या जातींमध्येच नाही तर एकाच जातीच्या जनावरांमध्ये देखील वेगवेगळे असते. ऋतूंनुसार उन्हाळ्यात वातावरणातील तापमानाच्या तणावामुळे दुधातील प्रथिनांचे प्रमाण कमी होते. गाय व्यायल्यानंतर पहिल्या आठवड्यात प्रथिनांचे प्रमाण कमी असते, नंतर त्याची पातळी स्थिर होते आणि दूध देण्याच्या दिवसांच्या वाढत्या संख्येसह हळूहळू वाढ होते. दुधातील प्रथिने हे जनावराच्या चयापचयासाठी विशिष्ट घटकांवर देखील अवलंबून असते, जसे की ऊर्जा, प्रथिने, तंतुमय पदार्थ, बायपास अमिनो ॲसिड, खनिजे, जीवनसत्वे इत्यादी. गायीच्या उत्पादन अवस्थेनुसार योग्य मात्रेत आहार दिला गेला नाही तर दुधातील प्रथिनांची अपेक्षित पातळी मिळत नाही किंबहुना कमी झालेली दिसते. बऱ्याच भागात शेतकरी कमी प्रथिने असलेला हिरवा चारा (हत्ती गवत, गिनी गवत, नेपिअर गवत, धारवाड हायब्रीड इ. खाऊ घालतात त्यामुळे दुधातील प्रथिने कमी लागते.

### दुधातील प्रथिने , फॅटचे गुणोत्तर

फॅटचे प्रमाण ०.८० पेक्षा कमी असेल, तर दुधातील प्रथिने कमी होणे ही समस्या असू शकते. हे प्रमाण ०.९५ पेक्षा जास्त असते, तेव्हा फॅट कमी लागू शकते. गायींना योग्य प्रमाणात चांगल्या गुणवत्तेचा हिरवा चारा, सुका चारा, पशुखाद्य, पाणी, ऋतुमानानुसार गोठा व्यवस्थापन, जंतनिर्मूलन, लसीकरण, आनुवंशिक क्षमता आणि आराम या सर्वांचा संयुक्त परिणाम दुधाचे उत्पादन आणि गुणवत्ता यावरती होत असतो.

### प्रथिने सुधारण्यासाठी उपाययोजना

विशेषतः गाय व्यायल्यानंतर संतुलित व पोषक आहार दिल्यास ऊर्जा संतुलित राहून वजन कमी होत नाही (इष्टतम बी सी एस ३ - ३.२५) आणि दुधाच्या प्रथिनांमध्ये ०.२-०.३ गुणांची सुधारणा होते. उन्हाळ्यात, प्रथिने / केसिनची पातळी लक्षणीयरीत्या कमी होते, कदाचित उष्णतेच्या ताणामुळे आहाराची चयापचय प्रक्रियेत नकारात्मक बदल होतात. जनावरांना उष्णतेचा नकारात्मक परिणाम कमी करणाऱ्यासाठी आहारामध्ये सर्व सकारात्मक बदल करून दुधातील प्रथिनांचे आणि केसिनचे प्रमाण सुधारावे.

### अमिनो आम्ल

मेथिओनाइन आणि लायसिन हे दुधाच्या उत्पादनावर परिणाम करणारी दोन महत्त्वाची अमिनो आम्ले आहेत. आतड्यात पोहोचणाऱ्या, चयापचय करण्यायोग्य प्रथिनांपैकी १५ टक्के लायसिन असावे (चयापचय करण्यायोग्य प्रथिने = रुमेनमध्ये न वापरलेल्या आहारातील सूक्ष्मजीव प्रथिने + प्रथिने), तर मेथिओनाइन ५ टक्के असावे; या दोन अमिनो आम्लांमधील इष्टतम प्रमाण ३:१ आहे. आहारात लायसिन आणि मेथिओनाइनमध्ये योग्य प्रमाण असते, तेव्हा चयापचय करण्यायोग्य प्रथिने आणि खाद्य दोन्हींच्या वापराची कार्यक्षमता वाढते, आणि गुणवत्तापूर्ण दूध मिळते.

### गुणवत्तापूर्ण आहाराचे महत्त्व

प्रथिनांचे प्रमाण ठरवणारा महत्त्वाचा घटक म्हणजे रुमेनमध्ये उपलब्ध असलेल्या नायट्रोजनचे प्रमाण आणि किण्वन करण्यायोग्य कार्बोहायड्रेट्सचा अंश, जे या संश्लेषणासाठी ऊर्जेचे स्त्रोत म्हणून काम करतात, विशेषतः स्टार्च आणि किण्वन करण्यायोग्य एनडीएफ, सूक्ष्मजीव प्रथिने अत्यंत महत्त्वाची आहेत, कारण ती आवश्यक अमिनो आम्लांपैकी ५०-८० टक्के असतात. आहारात अतिरिक्त फॅटचा समावेश केल्याने दुधाच्या प्रथिनांवर नकारात्मक परिणाम होतो (सरासरी ०.३ टक्के घट). योग्य वेळी चारा कापणी, योग्य साठवणूक आणि योग्य मात्रेत योग्य वेळी जनावरांना खाऊ घालणे आवश्यक आहे.

### ऊर्जा पुरवठा

दूध देणाऱ्या गायींच्या दुधातील प्रथिनांवर ऊर्जेचा परिणाम होतो. गायींमध्ये पुरेशी ऊर्जा नसेल तेव्हा त्यांच्या दुधातील प्रथिनांची पातळी कमी झालेली दिसते. उन्हाळ्यात वाढलेल्या तापमानामुळे जनावरे नैसर्गिक चारा कमी खातात. त्यामुळे जनावरांना आवश्यक तेवढी ऊर्जा मिळत नाही. वातावरण थंड असताना (सकाळी आणि संध्याकाळी) जनावरांना चारा द्यावा, दिवसा हिरवा चारा / मुरघास दिला जाऊ शकतो. जनावरांना आवश्यक ऊर्जा मिळावी म्हणून उच्च गुणप्रतीच्या पशुखाद्याची मात्रा या दिवसात वाढवून द्यावी.

### बायपास प्रथिने



जास्त दूध देणाऱ्या गायींना बायपास प्रथिनेयुक्त चारा आणि पशुआहार दिल्यास दुधातील प्रथिनांची पातळी सुधारू शकते. दुधाळ गायींमध्ये दुधातील केसीन आणि प्रथिनांचे प्रमाण वाढवण्यासाठी, उच्च-गुणवत्तेच्या प्रथिनांनीयुक्त आहार देणे गरजेचे आहे. विशेषतः लायसिन आणि मेथिओनाइन सारख्या आवश्यक अमिनो आम्लांवर लक्ष केंद्रित करणे, तसेच खाद्य मात्रा पूर्ण देणे आणि चांगल्या गुणवत्तेचा देणे आवश्यक आहे. जनावरांना एकाच वेळी चारा / पशुखाद्य देण्याऐवजी ते विभागून दिवसातून ३ ते ४ वेळा द्यावे. असे केल्याने पचन संस्थेवर अतिरिक्त ताण येत नाही, रवंथ योग्य होतो. त्याचे रूपांतर शरीर आणि उत्पादनास आवश्यक अन्नघटकात होते.

- » जनावरांना पिण्यायोग्य थंड पाणी २४ तास उपलब्ध ठेवावे. जनावरांवरती वातावरणातील उष्णतेचा ताण येऊ नये म्हणून जनावरे सावलीत बांधावीत.
- » दिवसातून तीन ते चार वेळा जनावरांच्या अंगावर पाणी शिंपडावे, शक्य असेल तर स्प्रिंकलर, फॉगर्स, फॅन बसवावेत.
- » उष्ण हवेचा थेट झोत जनावरांना लागू नये म्हणून गोठ्यात पडदे लावून ते वेळोवेळी गरजेनुसार ओले करावेत.
- » जनावरांना शांत बसून पूर्ण रवंथ करता येईल अशी पुरेशी आरामदायी जागा उपलब्ध करावी. जनावरांना उन्हाळ्यामध्ये उच्च गुणवत्तेचे टीएमआर आणि पीएमआर देणे आवश्यक आहे.

# वाढत्या उन्हात संकरित गायींना सांभाळा...

**देशी गाई वाढते तापमान सहन करू शकतात. पण संकरित गायींना वाढत्या तापमानाचा ताण सहन होत नाही. त्यामुळे संकरित गायींच्या आरोग्यावर परिणाम होऊन त्यांच दूध उत्पादन कमी होतं. त्यामुळे उन्हाळ्यात संकरित गायींची विशेष काळजी घ्यावी लागते.**

वातावरणातील तापमान वाढल्याने संकरित गाई त्यांच्या शरीराचे तापमान वाढू नये आणि ते सर्वसाधारण राहावे यासाठी प्रयत्न करते. पहिल्यांदा शरीरात तयार होणारी ऊर्जा शरीराबाहेर ढकलते आणि दुसरे म्हणजे शरीरात कमीत कमी ऊर्जा तयार होण्यासाठी दैनिक व्यवस्थापनात बदल करते. सर्वसाधारणपणे संकरित गाईसाठी ३३ अंश सेल्सिअस तापमान भारतीय गोवंश आणि म्हशीसाठी ३६ अंश सेल्सिअसपर्यंत तापमान योग्य समजले जाते. तापमान ज्या वेळेस जास्त होते, त्या वेळेस जनावरे आपल्या शरीराचे तापमान घर्मग्रंथी किंवा धापण्याच्या प्राक्रियेमार्फत नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतात. ज्या वेळी वातावरणातील तापमान या कक्षेबाहेर जाते म्हणजे कमी किंवा जास्त होते अशा वेळी जनावराला शरीरावर होणाऱ्या विपरीत परिणामांचा ताण सहन करावा लागतो.



### नेमका काय परिणाम होतो?

- शरीरात तयार होणारी ऊर्जा जनावर बाहेर टाकत असते; परंतु अशा वेळेस बाहेरील तापमान वाढल्याने ऊर्जा बाहेर टाकण कठीण होते. त्यातच बाहेरील ऊर्जेचा अधिक भार वाढल्याने जनावराच्या ऊर्जा निस्सारण यंत्रणेवर परिणाम होतो.
- संकरित जनावराच्या हार्मोन्स निर्मितीत बदल होतो, त्यामुळे दूध उत्पादन,आरोग्य, आहार आणि प्रजननावर विपरीत परिणाम होतो.
- शरीरातील अन्नघटक हे तापमान नियंत्रणासाठी वापरल्याने जनावर अस्वस्थ होते. आहार कमी होऊन तहान, भूक मंद होते. जनावर तापमान नियंत्रण करण्यासाठी स्वतःची यंत्रणा वापरण्यास सुरवात करते. यामध्ये श्वासोच्छ्वासाचा दर वाढून धाप लागल्यासारखे करते. तोंडाने श्वासोच्छ्वास करते. श्वासोच्छ्वास उथळ, जास्त वेगाने होतो. नाडीचा वेग वाढतो.
- जनावर स्वतः तपमान नियंत्रण करण्यापलीकडे जाते. शरीराचे तापमान १०४ ते १०६ अंश फॅरानहाइट वाढून कातडी कोरडी पडते. डोळे लालसर होतात, डोळ्यांतून पाणी गळते. पित्ताचा त्रास होऊन अतिसार होण्याची शक्यता असते. लघवीचे प्रमाण कमी होते. जनावरे बसतात. गाभण गायी गाभडण्याचे प्रमाण वाढते.
- ज्या वेळेस तापमान ३५ अंश सेल्सअसपेक्षा जास्त होते, त्यावेळेस दूध उत्पादनात ३० टक्क्यांपर्यंत घट येऊ शकते आणि जेव्हा हेच तपमान ४० अंश सेल्सअसपेक्षा जास्त जाते त्या वेळेस दूध उत्पादनामध्ये ५० टक्क्यांपर्यंत घट होऊ शकते. योग्य काळजी न घेतल्यास ही घट वाढत जाते.
- उष्णतेच्या परिणाम वासरे, कालवडींच्या वाढीवर अधिक प्रमाणात होत असतो. दुधातील स्निग्धांश व प्रथिनाचे प्रमाण कमी होते. आहार कमी होतो.
- प्रजनन यंत्रणेवर परिणाम होते. उष्णतेचा ताण असणारी गाय माजावर येत नाही. गाभण राहण्यास अडचणीचे ठरते. गाभण गाईंना उष्णतेचा ताण बसल्यास गर्भपात होऊ शकतो किंवा अकाली प्रसूती होऊ शकते. खुरांचे आजार तसेच लंगडेपणा वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे जास्त तापमानात संकरित गायींची अधिक काळजी घ्यावी लागते.



# उन्हाळ्यात दुधवाढीसाठी कसा असावा जनावरांचा आहार?

**दूध उत्पादन वाढविण्यासाठी उन्हाळ्यात आहारातील चाऱ्याचं प्रमाण कमी ठेवून पशुखाद्य किंवा खुराक देण्याचं प्रमाण वाढवाव. यामुळे आहारातील तंतुमय पदार्थाचं प्रमाण कमी झाल्यामुळे शुष्क पदार्थ खाण्याच्या प्रमाणात वाढ होईल. पण कधी कधी असं केल्यामुळे दुधातील फॅटचं प्रमाण घटण्याची शक्यता असते. त्यामुळे उन्हाळ्यात आहारातील ऊर्जेचं प्रमाण वाढवण्यासाठी स्निग्ध पदार्थाचा म्हणजेच विविध पेंडींचा किंवा बायपास फॅटचा वापर करावा. असा बदल केल्यामुळे एक ते दीड लिटरपर्यंत दूधाचं उत्पादन वाढू शकतं. यासोबतच जनावरांच्या शरीरावरील उष्णतेचा ताणही कमी होण्यास मदत होते.**

रवंथ करणाऱ्या जनावरांच्या आहारात फॅटयुक्त पदार्थांचा म्हणजे तेलबियांच्या पेंडींचा अतिवापर झाल्यास त्याचे दुष्परिणामही जाणवतात. यामध्ये तंतुमय पदार्थांचं पचन कमी होणं, कोटीपोटातील जीवजंतूना विषबाधा होणं, पचलेलं खाद्य शोषण्यासाठी अडथळा येणं असे दुष्परिणाम दिसून येतात. म्हणून बायपास फॅटचा वापर अतिशय उपयोगी पडतो. जनावरांच्या आहारात ५-७ टक्क्यांपेक्षा जास्त फॅट चा वापर करू नये. जनावरांना ३० ते ४० टक्क्यांपेक्षा जास्त आहारातील फॅट हे तेलबियामधून देवू नये. तेल बियांपेक्षा ४० ते ४५ टक्क्यांपर्यंत फॅटची पूर्तता ही धान्य आणि इतर घटकातून पूर्ण करावी. त्याबरोबरच १५ ते ३० टक्के फॅटची गरज बायपास फॅटचा वापर आहारात करून पूर्ण करावी.

### हिरव्या आणि कोरड्या चाऱ्याचे नियोजन

जनावराला शरीरीक क्रिया व्यवस्थित चालू ठेवण्यासाठी जास्त उर्जा पुरवणारा आहार दिल्यास असा आहार शरीर वाढीसाठी आणि दूध उत्पादन वाढीसाठी वापरला जातो. जनावरांच्या शरीरास मिळणारी ऊर्जा ही जनावरांचे कोरडा चारा खाण्याचे प्रमाण यावर अवलंबून असते. त्यामुळे उन्हाळ्यात जनावरांनी कोरडा चारा योग्य प्रमाणात खात राहावा यासाठी त्यांना थोडा-थोडा चारा खाण्यास द्यावा. चारा खाण्याचे प्रमाण कमी असल्यास आहारातील पोषक घटक म्हणजेच



पशुखाद्य, पेंडी यांच प्रमाण वाढवावं. त्यामुळे कमी चाऱ्यातून जनावरांना त्यांच्या शारीरिक गरजेनुसार पोषक घटक मिळत राहतील. जनावरांना दिवसाच्या थंड वेळी चारा खाण्यास द्यावा. हिरवा, वाळलेला चारा कुट्टी करुन मिसळून द्यावा. जनावरांच्या आहारात फक्त वाळलेल्या चाऱ्याचा वापर करू नये. जनावराच्या आहारात अशा प्रकारे बदल केल्यास उन्हाळ्यामध्ये वाढलेल्या तापमानाचे जनावरांच्या आरोग्यावरील विपरीत परिणाम टाळता येतील आणि दुधाचे उत्पादन ही वाढवता येईल.

# महाराष्ट्र होरपळणार! मुंबई-ठाण्यासह कोकणात 'तीव्र उष्णतेची लाट; विदर्भातही पारा चढणार



**मुंबई (प्रतिनिधी) –** राज्यातील कमाल तापमानात वाढ झाली असल्याने नागरिकांना तीव्र उकाड्याचा सामना करावा लागत आहे. विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि कोकण प्रांतातील काही भागात अधिक कमाल तापमानाची नोंद होत आहे. राज्यातील काही भागातील उकाड्यात वाढ होणार असून काही भागांना उष्णतेच्या लाटेचा तर काही भागांना पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.

राज्यातील अनेक भागात फेब्रुवारीपासूनच उकाडा जाणवत आहे. तसेच कमाल आणि किमान तापमानातही चढ-उतार पाहायला मिळत आहे. काही ठिकाणी उष्ण आणि दमट हवामानामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे यंदाचा उन्हाळ्यात राज्यातील नागरिकांना उन्हाच्या तीव्रतेचा सामना करावा लागणार असल्याचा अंदाज हवमान तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे. पुढील चार दिवसात राज्यातील कमाल तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होणार असून त्यांनतर तापमानात घट होईल, अशा अंदाज हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे. उत्तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात सामान्य तापमानाहुन अधिक कमाल तापमानाची नोंद होत आहे.

कोकण, विदर्भ , मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागांमध्ये पुढील चार ते पाच दिवस उष्णतेची लाट राहील असा अंदाज हवामान विभाकडून वर्तविण्यात आला आहे. यात छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली, अकोला, अमरावती आणि वर्धा आदी जिल्ह्यांमधील काही ठिकाणी उष्णतेची लाट राहील, असा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. मुंबई, पालघर, ठाणे , धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना आदी भागात सोमवारी उष्ण आणि दमट हवामान राहणार असून या भागांना हवामान विभागाकडून यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर कोल्हापूर आणि घाट भाग, सिंधुदुर्ग आदी भागात वादळी वाऱ्यासह हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

मागील काही दिवस मुंबईच्या कमाल तापमानात वाढ झाली आहे. रविवारी हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात ३३.६ अंश सेल्सिअस तर सांताक्रूझ केंद्रात ३५.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. सोमवारीही कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता असून सोमवारी शहरातील कमाल तपमान ३७ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २४ अंश सेल्सिअस राहील, असा अंदाज हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

# घरगुती सिलेंडरची बुकिंग आता २५ दिवसांनी

## इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर साठेबाजी रोखण्यासाठी सरकारचा निर्णय

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** केंद्र सरकारने घरगुती एलपीजी सिलेंडरच्या रिफिल बुकिंगच्या नियमांमध्ये बदल केला आहे. आता ग्राहक एक सिलेंडर बुक केल्यानंतर दुसरा सिलेंडर २१ दिवसांऐवजी २५ दिवसांनंतरच बुक करू शकतील. म्हणजेच, सरकारने रिफिल बुकिंगचा किमान प्रतीक्षा कालावधी ४ दिवसांनी वाढवला आहे.

मध्य पूर्वेतील तणावाच्या पार्श्वभूमीवर सरकारने गॅसची साठेबाजी रोखण्यासाठी आणि सर्व ग्राहकांना समान पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. सरकारी सूत्रांनी वृत्तसंस्था पीटीआय ला ही माहिती दिली आहे.

सरकारी सूत्रांनुसार, गेल्या काही काळापासून असे दिसून येत होते की, गरज नसतानाही लोक सिलेंडर बुक करून साठा करत होते. प्रतीक्षा कालावधी २५ दिवस केल्याने अनावश्यक बुकिंगला आळा बसेल. यामुळे ज्यांना खरोखर गरज आहे, त्यांना सहजपणे सिलेंडर मिळू शकेल. पेट्रोल-डिझेलच्या किमती सध्या स्थिर राहतील सरकारी सूत्रांनुसार, पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये सध्या वाढ होण्याची शक्यता नाही. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, जोपर्यंत आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची किंमत १३० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे जात नाही, तोपर्यंत देशांतर्गत बाजारात किमती स्थिर राहतील. सध्याच्या अंदाजानुसार, कच्चे तेल १०० डॉलर प्रति बॅरलच्या आसपास राहण्याची अपेक्षा आहे. इंधनाच्या पुरवठ्याबाबत सरकारने स्पष्ट केले आहे की, देशातील कोणत्याही पेट्रोल पंपावर तेलाची टंचाई नाही. पुरवठा साखळी पूर्णपणे सामान्य आहे. भविष्यातील कोणत्याही संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी भारताने 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' व्यतिरिक्त इतर मार्गांनी कच्च्या तेलाची खरेदी (सोर्सिंग) वाढवली आहे. यामुळे सागरी मार्गात कोणत्याही तणावाच्या स्थितीत पुरवठ्यात अडथळा येणार नाही.

ऊर्जा व्यवस्थापनाच्या बाबतीत भारत जगातील अनेक देशांपेक्षा चांगल्या स्थितीत दिसत आहे. सरकारी सूत्रांनी सांगितले की, बदलत्या जागतिक परिस्थितीत भारताची तयारी पाहून अनेक देशांनी नवी दिल्लीशी संपर्क साधला आहे. त्यांना भारताचे स्टॉक व्यवस्थापन आणि पुरवठा साखळीची रणनीती समजून घ्यायची आहे.

# घरकुल लाभार्थ्यांचे थकीत अनुदान लवकरच जमा होणार

**मुंबई (प्रतिनिधी) –** विदर्भ-कोकण ग्रामीण बँकेच्या विलीनीकरणामुळे तांत्रिक अडचणीत सापडलेल्या मंगळवेढा तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांचे थकीत अनुदान लवकरच त्यांच्या खात्यावर जमा केले जाईल, असे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत सांगितले.

मंगळवेढा मतदारसंघातील घरकुलाना निधी वितरित न होणे, घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास मोफत वाळू न मिळणे, जागेचे प्रलंबित प्रस्ताव आणि मनरेगाच्या थकीत मजुरीबाबतही आमदार समाधान आवताडे यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नांना उत्तर देताना मंत्री जयकुमार गोरे यांनी स्पष्ट केले की, बँक विलीनीकरणामुळे आयएफएससी कोड बदलल्याने पेमेंट प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला होता. सध्या नवीन खाती अपडेट करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत सर्व पात्र लाभार्थ्यांचे पैसे डीबीटीद्वारे त्यांच्या खात्यात वर्ग केले जातील. एकाही लाभार्थ्याचे पेमेंट थांबणार नाही, ही शासनाची ठाम भूमिका आहे.

घरकुलासाठी ५ ब्रास मोफत वाळू देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. आतापर्यंत दीड लाख लोकांनी याचा लाभ घेतला आहे. ज्यांना अद्याप वाळू मिळाली नाही, त्यांना ती उपलब्ध करून दिली जाईल, मात्र वाळूऐवजी रोख रक्कम देणे शक्य नाही. भूमिहीन लाभार्थी ज्यांच्याकडे स्वतःची जागा नाही, अशा लाभार्थ्यांना शासन जमीन उपलब्ध करून देईल किंवा जमीन खरेदीसाठी अर्थसाह्य करेल. प्रलंबित प्रस्तावांबाबत माहिती दिल्यास त्यावर तातडीने कारवाई करण्यात येईल. मनरेगा कर्मचाऱ्यांच्या संपामुळे किंवा तांत्रिक कारणांमुळे रखडलेली मनरेगाची मजुरी लाभार्थ्यांना लवकर मिळावी यासाठी विशेष प्रयत्न केले जातील, असेही गोरे यांनी सांगितले.

# भारतीय क्रिकेट संघाच्या विजयाने देशभरात जल्लोष

- ❑ भारतीय क्रिकेट संघाचे ऐतिहासिक विजयाबद्दल विधान परिषदेत अभिनंदन
- ❑ भारताच्या विजयाने क्रिकेट जगतात देशाचा अलौकिक गौरव

**मुंबई (प्रतिनिधी) –** टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अहमदाबाद येथे भारतीय क्रिकेट संघाने ऐतिहासिक विजय मिळविल्यामुळे देशभरात आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या विजयाने क्रिकेट विश्वात भारताचा गौरव उंचावला आहे. भारतीय संघाने दाखवलेल्या जिद्द, आत्मविश्वास आणि उत्कृष्ट सांघिक खेळामुळे पुन्हा एकदा क्रिकेट जगतात देशाचा अलौकिक गौरव झाला असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय क्रिकेट संघाने मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल विधान परिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला. त्यावेळी ते बोलत होते. या देदिप्यमान यशाबद्दल भारतीय क्रिकेट संघ, प्रशिक्षक मंडळ तसेच बीसीसीआयचे चेअरमन जय शाह यांचे राज्यशासन आणि राज्यातील जनतेच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन करत भारतीय संघाची विजयी पताका अशीच उंचावत राहो, अशा शुभेच्छा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिल्या.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबईतील वानखेडे स्टेडियम येथे झालेल्या उपांत्य फेरीत भारताने इंग्लंडचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. त्यानंतर अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियम येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव करत विश्वचषक जिंकला. या विजयासह सलग दोन वेळा टी-२० विश्वचषक जिंकणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला असून भारताने २००७, २०२४ आणि २०२६ अशा तीन वेळा टी-२० विश्वचषक जिंकण्याचा मान मिळवला आहे. हा केवळ क्रिकेटमधील विजय नसून भारतीय खेळाडूंच्या जिद्दीचा, संघभावनेचा आणि विश्वासाचा प्रतीक असल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नमूद केले. भारतीय संघाचे प्रशिक्षक गौतम गंभीर, कर्णधार सूर्यकुमार यादव, फलंदाज संजू सॅम्सन, तसेच गोलंदाज जसप्रीत बूमरा यांच्यासह संपूर्ण संघाचे त्यांनी विशेष अभिनंदन केले. अंतिम सामन्यात भारतीय गोलंदाजांनी प्रभावी कामगिरी करत न्यूझीलंडला पराभूत केले, तर संपूर्ण स्पर्धेत फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारतीय संघाने उत्कृष्ट सांघिक खेळाचे दर्शन घडवले असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

कोल्हापुरात 'मस्साजोग' प्रकरणाची पुनरावृत्ती?:

# माजी सरपंच २ महिन्यांपासून बेपत्ता, जंगलात जळालेल्या अस्थी सापडल्याने खळबळ

**कोल्हापूर (प्रतिनिधी) –** भुदरगड तालुक्यातील पाटगावचे माजी सरपंच आणि विद्यमान ग्रामपंचायत सदस्य महेश दिनकर पिळणकर (वय ५२) हे गेल्या दोन महिन्यांपासून बेपत्ता असल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. तपासादरम्यान बेवारस दुचाकी आणि जंगलात काही जळालेल्या अस्थी सापडल्याने या प्रकरणाचे गूढ आणखी वाढले आहे. पोलिसांचा तपास अत्यंत संथ गतीने सुरू असल्याचा आरोप करत संतप्त पिळणकर कुटुंबीय आणि सामाजिक संघटनांनी आज कोल्हापुरात तीव्र निदर्शने केली.

महेश पिळणकर हे ७ जानेवारी २०२६ रोजी रात्री आठच्या सुमारास जेवण करण्यासाठी घरातून बाहेर पडले, मात्र ते पुन्हा परतलेच नाहीत. पोलिसांच्या शोधमोहिमेदरम्यान पाटगावलगतच्या 'कुलकर्णी' नावाच्या शेताजवळ त्यांची दुचाकी बेवारस स्थितीत आढळून आली. यापेक्षाही धक्कादायक बाब म्हणजे, दुचाकी सापडलेल्या ठिकाणापासून काही अंतरावरच जंगलात जळालेल्या अवस्थेत काही हाडांचे अवशेष (अस्थी) सापडले आहेत. यामुळे पिळणकर यांच्यासोबत काही अघटित तर घडले नाही ना, अशी भीती परिसरात व्यक्त केली जात आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून गडहिंग्लजचे उपविभागीय पोलिस अधिकारी रामदास इंगवले आणि भुदरगडचे पोलिस निरीक्षक गोरक्ष चौधरी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जप्त केलेले जळालेले अवशेष मानवी आहेत की प्राण्यांचे, हे निश्चित करण्यासाठी ते फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठवण्यात आले आहेत. त्याचा अहवाल अद्याप प्रलंबित असल्याने तपासाची नेमकी दिशा स्पष्ट होऊ शकलेली नाही.

पोलिसांच्या तपासाला गती नसल्याचा आरोप करत आज पिळणकर कुटुंबीय आणि 'संविधान हक्क संघर्ष समिती'च्या वतीने कोल्हापूरच्या दसरा चौकात आंदोलन करण्यात आले. दोन महिने उलटूनही महेश पिळणकर यांचे नेमके काय झाले, याचा उलगडा का होत नाही? असा उद्विग्न सवाल त्यांच्या पत्नी आणि नातेवाईकांनी उपस्थित करत पोलिसांच्या कार्यक्षमतेवर थेट प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

या गूढ प्रकरणामुळे बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाच्या भयावह स्मृती जाग्या झाल्या आहेत. संतोष देशमुख यांचेही अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली होती आणि पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह जाळण्याचा प्रयत्न झाला होता.

# राखीव प्रवर्गातील परीक्षार्थींच्या परीक्षा शुल्कासंदर्भात समितीमार्फत अभ्यास करून सरकार निर्णय घेणार

**मुंबई (प्रतिनिधी) –** राज्यातील परीक्षार्थींना एकाच पदासाठी वेगवेगळ्या विभागांच्या वेगवेगळ्या परीक्षा देण्याची गरज भासू नये, यासाठी परीक्षांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. यामुळे परीक्षार्थींना वेगवेगळे परीक्षा शुल्क भरण्याची गरज भासणार नाही. तसेच अन्य राज्यातील तसेच केंद्र शासनाच्या परीक्षांमध्ये राखीव प्रवर्गातील परीक्षार्थींकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काचा समितीमार्फत अभ्यास करून शुल्क सवलतीसंदर्भात योग्य निर्णय घेण्यात येईल, असे मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेत सांगितले.

शासकीय नोकर भरती प्रक्रियेमध्ये आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्कासंदर्भात सदस्य श्वेता महाले यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. यावर मंत्री ड. आशिष शेलार यांनी उत्तर दिले. सदस्य सुधीर मुनगंटीवार, नितीन राऊत, राजेश पवार, राजकुमार बडोले, प्रताप अडसड आदींनी या चर्चेत सहभाग घेतला.

मंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शासनाने आतापर्यंत 'महाभरती'च्या माध्यमातून सुमारे १ लाख २० हजार पदांची भरती केली असून चालू अर्थसंकल्पात आणखी ७० हजारांहून अधिक पदांची भरती करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य शासनाच्या विविध विभागांतील भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ आणि विद्यार्थ्यांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. भरती प्रक्रियेत परीक्षा सुसूत्रीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी समान पदासाठी वेगवेगळ्या विभागांकडून स्वतंत्र परीक्षा घेतल्या जात असल्याने उमेदवारांना अनेक वेळा परीक्षा देऊन प्रत्येक वेळी शुल्क भरावे लागत होते. आता एकाच पदासाठी विविध विभागांच्या परीक्षांचे सुसूत्रीकरण करण्यात येत असल्याने उमेदवारांना वारंवार परीक्षा देण्याची गरज भासणार नाही, असे त्यांनी सांगितले.

तसेच कॅडर बकेटिंगची संकल्पना लागू करण्यात येत आहे. एका कॅडरमधील विविध पदे एकाच गटात समाविष्ट केल्यामुळे त्या कॅडरमधील सर्व पदांसाठी एकाच परीक्षेद्वारे संधी उपलब्ध होईल. यामुळे उमेदवारांना वेगवेगळ्या पदांसाठी स्वतंत्र परीक्षा देण्याची आवश्यकता कमी होणार असून परीक्षा शुल्काचा अतिरिक्त भारही कमी होईल. यासोबतच समान पात्रता असलेल्या पदांच्या सेवा प्रवेश नियमांतही सुधारणा करण्यात येत असल्याचे ड. शेलार यांनी सांगितले.

राखीव प्रवर्गातील उमेदवारांना अधिक सवलत देण्याबाबतही राज्य शासन सकारात्मक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना अधिक दिलासा देण्यासाठी केंद्र सरकार आणि इतर राज्यांमधील परीक्षा शुल्क संरचनेचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्यात येणार आहे. या अभ्यासानंतर आवश्यक असल्यास ५० टक्क्यांपेक्षा जास्त सवलत देण्याचाही निर्णय घेतला जाऊ शकतो, असे त्यांनी सांगितले. खासगी संस्थांकडून घेतल्या जाणाऱ्या भरती परीक्षांबाबतही राज्य शासन लक्ष ठेवणार असून अनावश्यक शुल्क आकारणी टाळण्यासाठी आवश्यक असल्यास 'कॅपिंग' करण्याचा विचार केला जाईल, असे शेलार यांनी नमूद केले.

# विकास शुल्क आणि शैक्षणिक फी आगाऊ वसूल केल्यास महाविद्यालयावर कारवाई होणार

**मुंबई (प्रतिनिधी) –** शिष्यवृत्तीधारक आणि आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयांनी विकास शुल्क आणि शैक्षणिक फी आगाऊ वसूल करू नये, यासाठी राज्य सरकार लवकरच शासन निर्णय निर्गमित करणार असल्याची घोषणा वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधानसभेत केली.

प्रश्नोत्तराच्या तासात आमदार योगेश सागर यांनी राज्यातील शासकीय व मान्यता प्राप्त वैद्यकीय मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील मुलींना शिक्षण व परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीबाबत प्रश्न विचारला होता.

मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, विद्यार्थ्यांकडून अनावश्यक विकास शुल्क आकारले जाऊ नयेत, यासाठी आदेश काढले जावेत याबाबत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्याशी चर्चा करण्यात येणार आहे. काही महाविद्यालये फी प्रतिपूर्ती होईल की नाही, या शंकेतून विद्यार्थ्यांकडून पैसे घेतात. महाविद्यालयांनी फी प्रतिपूर्तीच्या नावाखाली विद्यार्थ्यांची अडवणूक केल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

## टी.सी. हरवली

माझी योगेश उत्तमराव मेतलवाड या नावाची इयत्ता दहावी पासची टी.सी. मुखेड ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

- संपर्क पत्ता -

**योगेश उत्तमराव मेतलवाड**
**रा. कर्णा ता. मुखेड जि. नांदेड**
**मो.नं. ९९२३६१४८५९**

## जाहीर प्रगटन

मला माझे पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन मी खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे की, माझे पक्षकार **ढोले अशोक संभाजीराव** रा. जवाहर नगर, पोष्ट शिवाजी नगर नांदेड ता.जि. नांदेड यांनी **रमाबाई भिमराव जमदाडे** रा. शिराढोण ता.कंधार जि. नांदेड यांच्या कडून त्यांच्या मालकी व कब्जातील जमीन व त्यामधील विहीर जी मौजे शिराढोण ता. कंधार जि. नांदेड येथील गट क्र. 427 मधील 0 हे 47 आर शेत जमीन ज्याची चतु:सिमा पुर्वेस- रस्ता, पश्चिमेस- रघुनाथ माणिक पांडागळे यांची जमीन, दक्षिणेस- व्यंकटराव मारोतराव पांडागळे यांची जमीन आणि उत्तरेस- भगवान काळबा कपाळे यांची जमीन. येणे प्रमाणे सदरील चतु:सिमेच्या आतील वरील वर्णनाची जमीन माझे पक्षकार यांनी खरेदी करण्याचा करार केला असून करारापोटी बयाना रक्कमही दिलेली आहे.

तरी सर्व जनतेस व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणाची कांही उजर अथवा आक्षेप, न्यायालयीन वाद, कर्जबोजा, वारस, दानपत्र, मृत्युपत्र, खंडनामा इत्यादी असेल तर त्यांनी ८ दिवसाचे आत संबंधीत मुळ कागदपत्रासह आपला लेखी उजर खालील पत्यावर नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर किंवा आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास, वरील खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणाचा कांही आक्षेप किंवा उजर नाही असे समजुन सदरील खरेदी विक्रीचा व्यवहार माझे पक्षकार पुर्ण करतील याची नोंद संबंधीताने घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

मार्फत,
ॲड. एम.के. हुक्के
नांदेड
मो.नं. 9665710895

जाहीर प्रगटन देणार
ढोले अशोक संभाजीराव
रा. जवाहर नगर, पोष्ट शिवाजी नगर नांदेड
ता.जि. नांदेड

## तहसीलदार नांदेड यांचे कार्यालयातील संचिका जा.क्र. २०२५/जमा-१/१५५/म्हाळजा/सिआरच्या अनुषंगाने समक्रमांकित पत्र दिनांक ०९.०३.२०२६ सोबतचे

### // जाहीर प्रगटन //

सर्व जनतेस व हित सबंधिताना आणि मयत रफियोद्दीन गुलाम रसुल यांचे वारस यांना या जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते कि, मौ.म्हाळजा येथील सर्वे नं.16/1 मध्ये एकूण क्षेत्र 5 हे. 70 आर इतक्या जमीनीत अर्जदार आसिफोदिन हुसनोदिन, अ. गफार वलीबेग पि. कुतबोद्दीन, मोईनोदिन तुराबोदिन व इतर तसेच मयत फारूख अहेमद खा यांचे वारस यांनी या सर्वे नंबर मध्ये धारण केलेल्या जमिनीचे अधिकार अभिलेखात (7/12) मध्ये लेखन दोषामूळे / चुकीमूळे कमी क्षेत्रफळाची नोंद होवून उक्त क्षेत्र गैरअर्जदार रफियोदिन गुलाम रसुल यांच्या नावावर नोंद झाल्यामूळे त्यांना अनूज्ञेय असलेल्या क्षेत्रफळाची महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 155 अन्वये दुरूस्ती करण्याबाबत मा.तहसिलदार नांदेड यांच्याकडे अर्ज दिल्यावरून सदरील प्रकरण त्यांनी त्यांच्या फाईलवरून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 226 नूसार माझ्याकडे हस्तांतरित करून मला प्रस्तूत प्रकरण चालविण्यासाठी त्यांचे आदेश दिनांक 23.06.2025 अन्वये मला प्राधिकृत केले आहे त्यानूसार मी प्रस्तूत प्रकरण चालवून निर्णयासाठी हाती घेतले आहे. प्रकरणात सुनावणी दरम्यान गैरअर्जदार रफियोदिन गुलाम रसुल हे मयत असल्याचे अर्जदार वादी यांनी आमच्या निदर्शनास आणून.दिले आहे. तथापी त्यांनी मयताचे वारसाचा शोध घेवून त्यांच्या वतीने कायदेशिर प्रतिनिधि कळविण्याचे त्यांचेवर कायद्यानूसार बंधन असल्यामूळे त्यांनी त्यांचा शोध घेवूनही मयताचा ठाव ठिकाणा सापडत नसल्याने प्रस्तूत प्रकरणात सदर जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

सबब सर्व हितसंबंधित व मयताचे कोणी वारस असल्यास त्यांना या जाहीर प्रगटनाव्दारे सुचना मिळाल्यास त्यांनी सदरील लेखन दोष मध्ये दुरूस्ती करुन गैरअर्जदार रफियोदिन गुलाम रसुल यांनी त्यांच्या हिस्सायाची जमीन पूर्ण विक्री केल्यावरही त्यांच्या नांवे विद्यमान अधिकार अभिलेख ( 7/12) मध्ये लेखन दोषामूळे नोंदविण्यात आलेली 36.48 आर.चौ.मी. इतक्या क्षेत्राची नोंद कमी करून अर्जदार मोईनोदिन व इतर यांच्या नांवे 1 हे. 20 आर. 50 चौ.मी. ऐवजी 1 हे. 30 आर., अ. गफार वलीबेग पि. कुतबोद्दीन मयत यांचे वारसाचे नांवे 42 आर. 19 चौ.मी. ऐवजी 60 आर. 04 चौ.मी., फारूख अहेमद खा खुदरतुलाहखॉ मयत यांचे वारस मोहम्मद फय्याजउल्ला खॉन मोहम्मद फारूख व इतर यांचे नावे 30 आर. 35 चौ.मी. ऐवजी 38 आर. 98 चौ.मी. आणि असिफोदिन हूसनोदिन यांचे नांवे 36 आर. ऐवजी 36 आर.50 चौ.मी. अशी दुरूस्ती नोंद करणे प्रस्तावित आहे. करिता यासंदर्भात कोणतेही हितसंबंधितांचे काही म्हणणे अथवा आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून एक आठवडा ( 7 दिवस ) च्या आत सक्षम प्राधिकृत प्राधिकारी नायब तहसिलदार ( निवडणुक ) तहसिल कार्यालय नांदेड यांच्याकडे आपले म्हणणे किंवा काही आक्षेप असल्यास मूदतीत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. मूदतीत कोणतेही आक्षेप अथवा म्हणणे सादर न केल्यास प्रस्तूत प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यात येईल यांची सर्व सबंधितानी नोंद घ्यावी.

ठिकाण: नांदेड
दिनांक: 09 /03/2026

( नितेशकुमार बोलेलु )
प्राधिकृत प्राधिकारी
तथा नायब तहसिलदार, निवडणुक
तहसिल कार्यालय नांदेड

## Change In Name

My old name is **NARAYAN CHAVAN** which now I am changing as new name **NARAYAN VENKATRAO CHAVAN** Henceforth my all correspondence will be done as per my new name please consider the same
Contact - Narayan venkatrao Chavan
H.NO.1-9-91 Radhamai
Vasantnagar Nanded 431602
Cell 7875766653

## Change In Name

My old name is **CHAVAN SANGITA** which now I am changing as new name **SANGITA NARAYAN CHAVAN** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same
Contact -
H.NO 1-19-91 Radhamai Vasant Nagar
Nanded 431602
Cell 9421570453

## Change In Name

Change In Name My old Name is **SATISH BALJIRAO AKULWAR** Which now I am changing as New Name **SATISH BALAJIRAO AKULWAR** Hence forth My all correspondence will be done as per My Name please consider the same
**Address -** SATISH BALAJIRAO AKULWAR
Ast. post.Tamlur Tq. Deglur-431723 Mob.
No- 9423469591

## Change In Name

My Old Name is **SHAIKH SUMERA JANIMIYA** which now I am changing as New Name **SUMERA JAVED SHAIKH.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - Plot No. 97, Nilofer Colony, Asra Nagar, Taroda (Bk.) Nanded 431605**
**Mo.No. 9689276677**

## Change In Name

My Old Name is **SHAIKH JAVEDPASHA SK. MOULA** which now I am changing as New Name **JAVED MOULANA SHAIKH.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - Plot No. 97, Nilofer Colony, Asra Nagar, Taroda (Bk.) Nanded 431605**
**Mo.No. 9689276677**

## Change In Name

My Old Name is **ASMA BEGUM MOHAMMED YOUSUF** which now I am changing as New Name **ASMA BEGUM AZEEM AHMED.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - H.No. 1-7-1042, Beside Yosufiya Primary School, Peerburhan Galli No. 10, Taroda Nanded 431605 Mo.No. 9011338870**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

**गोदातीर समाचार**

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# शहरातील बेशिस्त वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी वाहतूक शाखेचे अधिकारी आणि कर्मचारी, महापालिकाही घेणार लवकरच निर्णय

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या प्रत्येक रस्त्यावर वाहनधारकांकडून बेशिस्तीचे दर्शन नेहमी पाहायला मिळते. वेडी–वाकडी वाहने रस्त्यात उभी करून वाहतुकीचा खेळखंडोबा करणाऱ्या या बेशिस्त वाहनचालकांना शिस्त लागावी यासाठी भर उन्हात शहर वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी प्रयत्न करत आहेत. मागील चार दिवसांपासून त्यांनी दंडात्मक कारवाईचा सपाटा सुरू केल्याने अनेक अनधिकृत चालणारी वाहने रस्त्यावरून गायब झाल्याचे पाहावयास मिळते. नांदेडकरांनी आणि वाहन चालकांनी वाहतूक शाखेला सहकार्य केल्यास नक्कीच वाहतूक मार्गात अडथळा निर्माण होणार नाही, असे वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे यांनी म्हटले आहे.



नांदेड शहराच्या मुख्य आणि अंतर्गत रस्त्यावर महापालिकेच्या वतीने कुठेही वाहन चालकांना थांबे देण्यात आलेले नाहीत. शहरात ऑटो चालकांची संख्या पाच हजारांहून अधिक आहे. त्यात विनापरवाना ऑटोचीही संख्या मोठी आहे. नांदेड दक्षिण आणि उत्तरला जोडणारा तरोडा नाका ते बर्की चौक हा एकमेव रस्ता असल्याने शहरामध्ये येणारा प्रत्येक नागरिक कुठे ना कुठेतरी या रस्त्याला स्पर्श करून जातो. रस्त्याची रुंदी पहिल्यापेक्षा काहीअंशी सध्या वाढविण्यात आल्याने वाहतूक खोळंबा जरी कमी होत असला तरी रस्त्यावर लावलेल्या वाहनांमुळे वाहतूक जागोजागी विशेष करून सायंकाळी आणि सकाळच्या वेळी जाम झालेली पाहावयास मिळते. माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनीही काही दिवसांपूर्वी महापालिका प्रशासन, महापौर, उपमहापौर यांनाही वाहतूक कोंडीकडे लक्ष घालून नांदेडकरांची यातून सुटका करावी अशा सूचना दिल्याने लवकरच महापालिका प्रशासन यात लक्ष घालणार असल्याचे सांगण्यात आले.

वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक साहेबराव गुट्टे हे आपल्या सेवानिवृत्तीच्या रजेवर गेल्याने या शाखेचा कारभार सहाय्यक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे यांच्या खांद्यावर देण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी टाकलेल्या जबाबदारीला पूर्ण ताकतीने ते सध्या शहरातील बेशिस्त वाहतुकीला शिस्त लावण्याचा प्रयत्न करत आहेत.

नांदेडचे तापमान आजघडीला ४० अंशावर पोहोचले असतानाही ते आपल्या सहकाऱ्यांसोबत वाहनांची तपासणी करत आहेत. मागील चार दिवसांपासून त्यांनी मोठ्या प्रमाणात अवैध वाहतूक, जडवाहन, विनापरवाना ऑटो, ट्रिपल सीट, फटाके फोडणाऱ्या बुलेट यासोबतच रस्त्यावर हॉकर्स, फेरीवाले, फळवाले अतिक्रमण करणाऱ्यांना समज देऊन दंडात्मक कारवाई सुरू केली आहे.

नांदेडकरांनी आणि वाहन चालकांनी आपली वाहने व्यवस्थित ठिकाणी उभी केल्यास वाहतुकीचा खेळखंडोबा होणार नाही असेही नागरगोजे यांनी सांगितले. मागील चार दिवसांपासून त्यांनी जवळपास ४०० हून अधिक वाहनांविरुद्ध दंडात्मक कारवाई केली आहे. विशेष म्हणजे त्यांच्यावर रस्ता सुरक्षा पथकाचीही जबाबदारी असल्याने अनेक रस्त्यांवर मद्यप्राशन करून शहराच्या शांततेला गालबोट लावणाऱ्यांना त्यांनी चांगलाच इंगा दाखवला आहे. रस्त्यावर कुठेही मद्य प्राशन होत असेल किंवा शाळा, महाविद्यालय परिसरात आंबट शौकीन तरुण फिरत असतील तर आमच्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही नागरगोजे यांनी केले आहे.

# हळद क्षेत्रातील शेतकरी–निर्यातदार संबंध मजबूत करण्यासाठी खरेदीदार–विक्रेता मेळावा

**नांदेड (प्रतिनिधी)** –जागतिक हळद व्यापारात भारताचे नेतृत्त्व टिकवून ठेवण्यासाठी दर्जेदार उत्पादन व ट्रेसेबिलिटीचे महत्त्व अधिक असून हळद उत्पादनासाठी भारताची जागतिक स्तरावर मजबूत ओळख आहे. दर्जा सुधारणा, ट्रेसेबिलिटी आणि मूल्यवर्धन यावर भर दिल्यास आपल्या शेतकरी व उद्योगांसाठी निर्यात संधी अधिक वाढतील, असे प्रतिपादन राष्ट्रीय हळद बोर्डाच्या सचिव सौ. एन. भवानीश्री यांनी केले.



हळद क्षेत्रातील व्यापार संधी वाढविणे आणि बाजारपेठेतील दुवे मजबूत करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय हळद बोर्डाच्यावतीने स्पायसेस बोर्ड इंडिया यांच्या सहकार्याने आज नांदेड येथील VITS हॉटेलमध्ये हळदविषयक खरेदीदार–विक्रेता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात महाराष्ट्रातील हळद उत्पादक शेतकरी, उत्पादक कंपन्या, देशभरातील निर्यातदार, उद्योग प्रतिनिधी तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी सहभागी झाले.

या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रीय हळद बोर्डाच्या सचिव सौ. एन. भवानीश्री यांच्या उपस्थितीत झाले. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणीचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शिवाजीराव शिंदे तसेच मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्र हिंगोली येथील प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी हळद मूल्य साखळी मजबूत करण्यासाठी शेतकरी, संस्था आणि निर्यातदार यांच्या समन्वयित प्रयत्नांचे महत्त्व स्पष्ट केले. खरेदीदार–विक्रेता मेळावे हे शेतकऱ्यांना थेट बाजारपेठेशी जोडण्याचे प्रभावी व्यासपीठ असून, मूल्यवर्धन व चांगला दर मिळविण्यासाठी नवी संधी निर्माण करतात, असेही त्यांनी सांगितले.

मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्र हिंगोलीचे अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील यांनी त्यांच्या प्रतिनिधीमार्फत संदेश पाठवून हळद–आधारित उद्योग बळकट करण्याचे तसेच शेतकऱ्यांचा मूल्यवर्धन उपक्रमांमध्ये सहभाग वाढविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. उत्पादकता व गुणवत्ता वाढविण्यासाठी सुधारित शेती पद्धती आणि तंत्रज्ञान विकसित करण्याच्या गरजेवर भर दिल्याचे सांगून संशोधन संस्थांची भूमिका सहयोगी अधिष्ठाता डॉ. शिवाजीराव शिंदे यांनी स्पष्ट केली.

कार्यक्रमादरम्यान कृषी विभाग, राज्य शासनाच्या उद्योग विभाग, निर्यातदार संघटना तसेच संशोधन संस्था (मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्र हिंगोली) यांचे तज्ज्ञ यांनी तांत्रिक सत्रे घेतली. या सत्रांमध्ये हळद लागवडीत उत्पादकता व गुणवत्ता वाढविणे, निर्यात दर्जा मानके व अवशेष नियंत्रण, मूल्यवर्धनाच्या संधी तसेच सेंद्रिय हळद उत्पादन तंत्रज्ञान यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

राज्य सरकारचे आ. श्रीजया चव्हाण यांना आश्वासन

# स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पदभरती प्रक्रियेला लवकरच सुरुवात

**नांदेड (प्रतिनिधी)** –राज्यातील सर्व नगरपालिका, नगरपंचायत व महानगरपालिकांमध्ये एकूण ६ हजार १२७ पदे रिक्त असून, या पदांच्या भरतीची प्रक्रिया सुरु झाल्याचे नगरविकास राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांनी म्हटले आहे. भोकर मतदारसंघाच्या भाजप आमदार श्रीजयाताई चव्हाण यांनी विधानसभेत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्या बोलत होत्या.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील रिक्त पदांसंदर्भात लक्षवेधीवरील चर्चेत आ. श्रीजयाताई चव्हाण यांनी नांदेड जिल्ह्यातील १६ नगरपरिषद व नगरपंचायतीं–मध्ये ७७४ मंजूर पदांपैकी २१७ रिक्त पदे असल्याचा मुद्दा उपस्थित केला. रिक्त पदांमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता ही पदे भरण्याबाबत राज्य सरकारकडून काय उपाययोजना केल्या जात आहेत, असा प्रश्न त्यांनी नगरविकास राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांना केला. त्यावर उत्तर देताना त्या म्हणाल्या की, २०२३ मध्ये एकूण १ हजार ७८२ पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. त्यातील ९६४ कर्मचारी सेवेत रुजू झाले आहेत. २०२२ च्या वर्षातील सरळसेवा भरतीच्या अनुषंगाने परीक्षा घेण्यासाठी टीसीएस व आयबीपीएस समवेत पत्रव्यवहार सुरु आहे. २० महानगरपालिकांमधील रिक्त पदे भरतीची प्रक्रिया सुरु झाली असून, उर्वरित महापालिकांसाठी भरती प्रस्तावित करण्यात आली आहे.

# श्री शारदा भवन शिक्षण संस्था संचालित नांदेड फार्मसी कॉलेजच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड फार्मसी कॉलेजच्या वतीने महिलांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी तसेच समाजातील योगदानाची जाणीव करून देण्यासाठी सोमवार, दि. ०९ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन २०२६ उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम मान्यवरांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन करून सरस्वती व क्रांतिकारी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले.

या कार्यक्रमास नांदेड महानगर–पालिकांच्या महापौर कविताताई मुळे, माजी महापौर जयश्रीताई पावडे तसेच येवतीकर यांची विशेष



अतिथी म्हणून उपस्थिती लाभली. त्यांचे आजी–माजी प्राचार्य यांच्या सौभाग्यवतींनी शाल व श्रीफळ तसेच पुष्पगुछ देऊन स्वागत केले. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, त्यांच्या पत्नी आणि मुले यांची खास करून उपस्थिती लाभली. कॉलेजचे प्रा. टेकाळे व सगुफा यांनी सर्वांचे पुष्पगुछ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी आजी–माजी महापौर यांनी उपस्थितांना संबोधित केलं. आपल्या भाषणात या उत्सवासाठी ८ मार्च हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस महिला हक्क चळवळीच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे, जो प्रजनन हक्क, लिंग समानता आणि महिलांवरील हिंसाचार आणि गैरवापर रोखणे यासारख्या महत्त्वाच्या समस्यांकडे लक्ष वेधतो.

# नांदेडच्या वसंतनगर भागात रस्त्याच्या कामाचा शुभारंभ -आमदार चिखलीकर



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील प्रभाग ९ मधील वसंतनगर नांदेड येथील वत्सल सुपर मार्केट ते पी. डी. जाधव यांच्या घरापर्यन्त सिमेन्ट रस्ता करणे ८५ लक्ष कामाचे दिनांक ८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता वसंतनगनगर येथे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी भाजपा प्रदेश महिला मोर्चाच्या उपाध्यक्षा प्रणिता देवरे– चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणी प्रवीण पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष माधव पावडे, आर. डी. कवळे, कैलास देशमुख गोरठेकर, पी. डी. जाधव, देवराव कंकाळ, गंगाधर साधू, बी. आर. कदम, प्रवीण कदम, विशाल कदम, शिवाजीराव हुसेकर, प्रवीण साधू, प्रकाश राशतवार, शंकरराव वट्टमवार, संदीप चिटमलवार, बालाजी उत्तरवार, संजय वांगीकर, योगेश वट्टमवार, प्रविण दमाम, डॉ. गणेश मनूकर, डॉ. स्वप्नील आढाव, डॉ. संकेत आढाव, राहूल पाटील, बालासाहेब देशमुख पार्डीकर, नागेश कंकाळ, इरबाजी कदम, दीपक भडके, मनपाचे कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, सा. बां. चे नाईक, मनपाचे उपअभियंता सोनसळे, तुकाराम पाटील आदींची उपस्थिती होती.

# सचिन आडे यांचे निधन

**उमरी (प्रतिनिधी)** – उमरी तालुक्यातील ईश्वरनगरचे सचिन वसंत आडे वय ३० वर्ष (ह. भ. प. वसंत आडे महाराज यांचा मुलगा) रा. ईश्वरनगर तांडा ता. उमरी, जि. नांदेड यांचा पुणे येथे अपघातात मृत्यू झाला आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, आई, वडील व चार बहिणी आहेत. त्यांच्या पार्थिवावर मौजे ईश्वरनगर तांडा ता. उमरी येथे सायंकाळी ६ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. त्यांच्या निधनाने अनेकांनी दुःख व्यक्त केले.

# महानगरपालिकेत महिला दिनाचा उत्साहात जागर; महापौर कविता मुळे यांच्या हस्ते विविध उपक्रमांचे उद्घाटन

**नांदेड (प्रतिनिधी)** –जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्यावतीने सोमवार, दि. ९ मार्च रोजी महिला सक्षमीकरण आणि सन्मानासाठी पालिकेच्या कै. शंकरराव चव्हाण सभागृह परिसर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष कार्यक्रमांचे उद्घाटन महापौर कविता मुळे यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी बोलताना महापौर कविता मुळे म्हणाल्या की, स्त्री ही समाजाचा मुख्य आधारस्तंभ आहे. महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले असून, त्यांच्या आरोग्याची आणि आर्थिक स्वावलंबनाची जबाबदारी पालिकेच्यावतीने समर्थपणे पार पाडली जाईल. सर्व महिलांनी कर्तबगार महिलांचे जीवनचरित्र डोळ्यासमोर ठेवून आपले आयुष्य समृद्ध करावे, नांदेड शहराच्या विकासाचा संकल्प पूर्ण करण्यासाठी सर्व महिलांनी त्यांना सहकार्य करावे, असे आवाहन केले.

याप्रसंगी महापालिका महिला कर्मचारी व महिला सदस्यांसाठी महिला सक्षमीकरण विषयावर आशा पैठणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नवनिर्वाचित पालिका महिला सदस्यांना महापौर कविता मुळे यांच्या हस्ते शाल, पुष्प, पुस्तक,



व झाडाचे रोपटे भेटवस्तू स्वरूपात देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिलांना सुद्धा महापौरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात महापालिकेच्या महिला सदस्यांची व मनपाच्या महिला कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महानगरपालिकेच्या समाज विकास शाखेने विशेष परिश्रम घेतले.

# जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पत्रकारांच्या वतीने ग्रामीण पोलीस स्टेशन येथे कार्यरत महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – जागतिक महिला दिनाच्या–निमित्ताने ८ मार्च रोजी ग्रामीण पोलीस स्टेशन येथे विविध विभागात कार्यरत महिला पोलीस अधिकारी, महिला पोलीस अमलदार, महिला होमगार्ड यांचा नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांची विशेष उपस्थिती होती.



याप्रसंगी नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रमेश ठाकूर, तिरूपती पाटील घोगरे, कोषाध्यक्ष सारंग नेरलकर यांची उपस्थिती होती. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महिला पोलीस अधिकारी व महिला पोलीस अमलदार, महिला होमगार्ड यांच्यात आनंद द्विगुणित व्हावा यासाठी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने ग्रामीण पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांच्या उपस्थितीत कार्यरत सहाय्यक पोलीस निरीक्षक रेखा काळे, महिला पोलीस, महिला होमगार्ड यांच्यासह विविध विभागातील कार्यरत महिलांचा पुष्प, शाल पेन देऊन माजी अध्यक्ष रमेश ठाकूर, तिरूपती पाटील घोगरे व कोषाध्यक्ष सारंग नेरलकर यांनी सत्कार केला.

# नांदेड विभागात ऑपरेशन यात्री सुरक्षा, रेल सुरक्षा, नन्हे फरिश्ते अंतर्गत प्रवासी सुरक्षा मोहिमांमध्ये आरपीएफची कामगिरी

**नांदेड (प्रतिनिधी)**– दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील रेल्वे सुरक्षा बलने ऑपरेशन यात्री सुरक्षा, ऑपरेशन रेल सुरक्षा आणि ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत अलीकडे राबविण्यात आलेल्या प्रभावी कारवायांमधून प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करणे आणि रेल्वे संपत्तीचे संरक्षण करणे या बाबतीत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत ७ मार्च २०२६ रोजी गाडी क्रमांक १७६३० नांदेड–हडपसर एक्सप्रेसमध्ये छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावर घडलेल्या चैन स्नॅचिंगच्या घटनेचा आरपीएफ, जीआरपी आणि सीआयबी पथकाने संयुक्त कारवाई करून यशस्वी उलगडा केला. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी याला प्लॅटफॉर्म क्रमांक ०४ जवळ अटक करण्यात आली. त्याच्याकडून चोरीस गेलेली सुमारे १७.५७ ग्रॅम वजनाची सोन्याची साखळी, अंदाजे रु. ४३,७०० किंमतीची जप्त करण्यात आली असून पुढील तपासासाठी ती सरकारी रेल्वे पोलीस यांच्या ताब्यात देण्यात आली आहे. याशिवाय रविवार, दि. ८ मार्च २०२६ रोजी पिंगळी रेल्वे स्थानकाजवळ आरपीएफ व जीआरपीच्या संयुक्त पथकाने रेल्वे प्रवाशांना लक्ष्य करून दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतले.

या कारवाईदरम्यान चार मोबाईल फोन, दोन मोटारसायकली आणि तीन धारदार लोखंडी शस्त्रे जप्त करण्यात आली असून त्यांची एकूण अंदाजे किंमत सुमारे रु. १.८० लाख आहे. आरोपींना जीआरपी नांदेड यांच्या ताब्यात देण्यात आले असून त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू आहे.

८ मार्च २०२६ रोजी परभणी रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक ०२ वर प्रवाशांचे सामान चोरी



करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका संशयित व्यक्तीला आरपीएफ आणि जीआरपी कर्मचाऱ्यांनी ताब्यात घेतले. संबंधित आरोपीला जीआरपी परभणी यांच्या ताब्यात देण्यात आले असून त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ऑपरेशन रेल सुरक्षा अंतर्गत ०७.०३.२०२६ रोजी अकोला रेल्वे स्थानकावर आरपीएफ कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे रेल्वे सिग्नलिंग केबल चोरीची घटना टळली.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com